

# श्री ज्ञानेश्वरी
## अध्याय नववा

या अध्यायाला राजविद्याराजगुह्ययोग असे नांव आहे. कर्मयोगाचे आचरण करणाऱ्या पुरुषास पूर्ण ज्ञान होऊन मनाची शांति किंवा मुक्तावस्था कशी प्राप्त होते हे दाखविण्यासाठी ज्ञानविज्ञानाच्या निरुपणाला सातव्या अध्यायात सुरवात करून अक्षर आणि क्षर पुरुषाचे स्वरुप सांगितले. अंतकालीहि ते स्वरुप मनात कायम रहावे म्हणून पातंजलयोगाने समाधि लावून ॐकार उपासना शेवटी कशी करावी याचेही गेल्या अध्यायात वर्णन केले.जेणेकरुन परमेश्वराचे ज्ञान सुलभ होईल असा राजमार्ग या अध्यायात आता भगवंत सांगत आहे म्हणून या अध्यायाला असे नांव आहे.

यात 34 श्लेक असून 535 ओव्या आहेत. यातील 18,26,57,58,102,305, 350,453,510 या ओव्या फार सुंदर आहेत.

महाराजांच्या मताने नववा अध्याय भाष्य करण्यास कठीण आहे . तो फारच सुंदर आहे.त्याचप्रमाणे एथे पूर्वखंड समाप्त होतो. आणि गीतेचे मूळ प्रयोजन संपते.

**श्रीज्ञानेश्वरी**
**अध्याय नववा**

' तरी अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासि पात्र होईजे ' ।
हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड ! ऐका ।।+1।।
परी प्रौढी [1] न बोलो हो ,जी । तुम्हां सर्वज्ञांच्या समाजी । 1 आढ्यतेने
' देयावे अवधान ' हे माझी । विनवणी सलगीची ।।+2।।
कां ,जे लळेयांचे [2] लळे [3] सरती । मनोरथांचे मनोरथ पुरती । 2 हट्ट करणाराचे 3 लाड करणे
जरी माहेरे श्रीमंते होती , ।तुम्हा ऐसी ।।+3।।
तुमचे या दिठिवेयाचिये वोले [4] । सासिन्नले [5] प्रसन्नतेचे मळे । 4 ओलावा 5 भरास आले
ते साउली देखोनि लोळे । श्रांतु जी ,मी ।।+4।।
प्रभु,तुम्ही सुखामृताचे डोहो । म्हणौनि,आम्ही आपुलिया स्वेच्छा वोलावो [6] लाहो ।
येथही जरी सलगी करु बिहो , ।तरी निवो के ?पां ! ।।+5।। 6 आश्रय
नातरी , बालक बोबडां बोली , । कां , वांकुडा विचुका पाउली ।
ते चोज करुनि , माउली । रिझे जेवी ।।+6।।
तेवी, ' तुम्हा संतांचा पढियावो [7] । कैसेनि तरी आम्हावरी हो '। 7 प्रेम
या बहुवा [8] आळुकिया [9] जी ,आहो । सलगी करीत ।।+7।। 8 फार 9 तीव्र इच्छा
वांचूनि , माझिये बोलतिये योग्यते ,। सर्वज्ञ भवादृश [10] श्रोते । 10 आपल्या सारखे
काय धड्यावरी [11] सारस्वते । पढो सिकिजे ?।।+ 8।। 11 वस्त्रावरील कित्ता
अवधारा,आवडे तेसणा [12] धुंधुरु [13] । परि महातेजी न मिरवे;काय करु ! ।
अमृताचिया ताटी वोगरु [14] । ऐसी रससोय कैची ?।।+9।। 12 हवा तेवढा
हां , हो , हिमकरासी [15] विंजणे [16]। कीं ,नादापुढे आइकवणे । 13 काजवा 14 वाढणे
लेणियासी लेणे । हे कही आथी ?।।+10।। 15 चंद्र 16 वारा घालणे
सांगा,परिमळे काय तुरंबावे [17] ?। सागरे कवणे ठायी नाहावे ?। 17 वास घ्यावा
हे गगनचि आडे [18] आघवे । ऐसा पवाडु [19] कैचा ? ।।+11।। 18 झाकण 19 विस्तार
तैसे , तुमचे अवधान धाये [20] । आणि तुम्ही म्हणा, ' हे होये ' । 20 तृप्त
ऐसे वक्तृत्व कवणा आहे । जेणे रिझा तुम्ही ? ।।+12।।
तरी विश्वप्रगटितिया गभस्ती,। काय हातिवेन [21] न कीजे आरती ? ।
कां , चुळोदके आपांपती [22] । अर्ध्यु नेदिजे ? ।।+13।। 21 काकडवातीने
प्रभु तुम्ही महेशाचिया मूर्ती । आणि मी दुबळा ; अर्चितुसे भक्ती । 22 समुद्र
म्हणौनि , बोल जऱ्ही गंगावती [23]।तऱ्ही स्वीकाराल की ।।+14।। 23 निरगुडीप्रमाणे
बाळक बापाचिये ताटी रिगे , । आणि बापातेचि जेवऊ लागे । वायफळ
की , तो संतोषिलेनि , वेगे । मुखचि वोढवी [24] ।।+15।। 24 पुढे करतो
तैसा , मी जरी तुम्हाप्रती । चावटी [25] करीतसे बाळमती , । 25 बडबड
तरी , तुम्ही संतोषिजे , ऐसी जाती । प्रेमाची असें ।।+16।।

आणि तेणे आपुलेपणाचेनि मोहे , । तुम्ही संत घेतले असा बहुवे ।
म्हणौनि , केलिये सलगीचा नोहे । आभारु [1] तुम्हा ।।+17।। 1 ओझे
**अहो ! तान्हयाचे लागता झटे [2] , । तेणे अधिकचि पान्हा फुटे ।** **2 ढुसणी**
**रोषे प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि [3] ।। +18।।** 3 आवडता
म्हणौनि , मज लेकुरवाचेनि बोले । तुमचे कृपाळूपण निदैले , ।
ते चेइले , ऐसे जी ! जाणवले ,। यालागी बोलिलो मी ।।+19।।
एऱ्हवी,चांदिणे पिकविजत आहे चेपणी [4] ?।कीं,वारया घापत [5] आहे वाहणी [6]?।
हां ,हो , गगनासि गंवसणी । घालिजे केवी ? ।।+20।। 4 आढी 5 घालणे 6 प्रवाह
आइका , पाणी वोथिजावे [7] न लगे । नवनीती माथुला [8] न रिंगे । 7 पातळ करणे 8रवी
तेवी , लाजिले व्याख्यान निगे । देखोनि जयाते ।।+21।।
हे असो ; शब्दब्रह्म जिये बाजे , । शब्द मावळलेया ,निवांतु निजे ।
तो गीतार्थु मऱ्हाठिया बोलिजें । हा पाडू काई ?।।+22।।
परि,ऐसियाही मज धिवसा [9] , । तो पुढति याचि येकी आशा ,। 9 धेर्य
जे धिटीवा [10] करूनि भवादृशा [11] । पढियंतया होआवे ।।+23।। 10 धीटपणे
तरि , आतां ,चंद्रापासोनि निववित्ते , । जे अमृताहूनि जीववित्ते । 11 आपल्यासारख्या
तेणे अवधाने , कीजो वाढते । मनोरथां माझिया ।।+24।।
कां ,जै दिठिवा तुमचा वरुषे , । तै सकळार्थ सिद्धी मती पिके ।
एऱ्हवी , कोंभेला [12] उन्मेषु सुके , । जरी उदास तुम्ही ।।25।। 12 अंकुर दशेला
**सहजे तरी अवधारा , । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा , ।** आलेला
**तरी , दोंदे पेलती [13] अक्षरां । प्रमेयाची ।।+26।।** 13 पोट सुटणे
अर्थ बोलाची वाट पाहे , । तेथ अभिप्रावोचि , अभिप्रायाते विये ।
भावाचा फुलौरा होत जाये । मतिवरी ।।+27।।
म्हणौनि ,संवादाचा सुवावो ढळे [14] ,। तऱ्ही हृदयाकाश सारस्वते वोळे [15] ।14 अनुकुल वारा
आणि श्रोता दुश्चिता तरि वितुळे [16] । मांडला रसु ।।+28।। 15 तृप्त होणे
अहो ! चंद्रकांतु द्रवता कीर होये,। परि,ते हातवटी चंद्री की आहे । 16 विस्कळीत होणे
म्हणौनि , वक्ता तो ,वक्ता नोहे , । श्रोतेनिविण ।।+29।।
परि 'आता आमुते गोड करावे । ऐसे तांदुळी कासया विनवावे ?।
साइखडियाने [17] काइ प्रार्थावे । सूत्रधाराते ?।।+30।। 17 बाहुली
तो काय बाहुलियाचिया काजा नाचवी ?। की ,आपुलिये जाणिवेची कळा वाढवी ? ।
म्हणौनि , आंम्हा या ठेवाठेवी । काय काज ? ।।+31।
तंव श्रीगुरु म्हणती , ' काइ जाहले ? । हे समस्तही आंम्हा पावले ।
आता सांगै , जे निरोपिले । नारायणे ' ।।+32।।
येथ संतोषोनि निवृत्तिदासे , । ' जी जी ' म्हणौनि उल्हासे, ।
अवधारा ; ' श्रीकृष्ण ऐसें । बोलते जाहले ।।+33।।

**श्रीभगवानुवाच**

**इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।**
**ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ।।1।।**

**श्रीभगवान म्हणाले आता तू दोषदर्शी नाहीस म्हणून गुह्यातले गुह्य असे विज्ञानसहित ज्ञान,जे जाणितल्याने पापापासून मुक्त होशील,ते हे मी तुला सांगतो**

नातरि , अर्जुना ! हे बीज । पुढती सांगिजेल तुज ।
जे , हे अंतःकरणीचे गुज [1] ।जिवाचिये ।।34 ।। 1 गुपित
' येणे माने जीवाचे हिये फोडावे [2] । मग , गुज कां ,पां मज सांगावे ?। 2 अंतःकरणातील
ऐसे काही स्वभावे । कल्पिशी जरी , ।।35।। गुप्त गोष्ट सांगावी
तरी , परियेसी गा प्राज्ञा [3] । तूं आस्थेचीच संज्ञा [4] । 3 बुध्दीमंता 4 खूण
बोलिलिये गोष्टीची अवज्ञा । नेणसी करु ।।36।।
म्हणौनि , गूढपण आपुले मोडो , । वरि , न बोलणेही बोलावे घडो ।
परि , आमुचिये जीवीचे पडो । तुझ्या जीवी ! ।।37।।
अगा , थानी कीर दूध गुढ । परि , थानासीचि नव्हे की गोड ! ।
म्हणौनि , सरो कां सेवितयाची चाड । जरी अनन्यु मिळे ।।38।।
मुडाहूनि [5] बीज काढिले , । मग निर्वाळलिये भूमी पेरिले , । 5 कणगीतून
तरि , ' ते सांडीविखुरी गेलें ' । म्हणो ये कायी ? ।।39।।
यालागी , सुमनु आणि शुद्धमती , । जो अनिंदकु , अनन्यगती ,।
पै , गा गौप्यही , परी तयाप्रती । चावळिजे [6] सुखे ।।40।। 6 बोलणे
तरि , प्रस्तुत आता गुणी ही । तूं वाचून आणिक नाही ।
म्हणौनि , गुज तरी तुझ्या ठायी । लपऊ नये ।।41।।
आता किती , नावनावा, [7] गुज । म्हणता , कानडे [8] वाटेल तुज । 7 वारंवार 8 चमत्कारिक
तरी ज्ञान ,सांगेन सहज । विज्ञानेसी ।।42।।
परि , तेचि ऐसेनि निवाडे , । जैसे , भेसळले खरे कुडे ।
मग , काढिजे फाडोवाडे [8] । पारखूनिया ।।43।। 8 स्पष्टपणे
कां ,चाचूचेनि सांडसे [9] , । खांडिजे [10] पय पाणी राजहंसे । 9 चिमटा 10 वेगळे करणे
तुज ज्ञान विज्ञान तैसें । वाटूनि देऊ ।।44।।
मग वारयाचिया धारसा [11] ।पडिन्नला , कोंडा कां नुरेचि जैसा । 11 प्रवाह
आणि कणांचा आपैसा । राशिवा जोडे ।।45।।
तैसे , जे जाणितलेयासाठी [12] ,। संसार संसाराचिये गाठी । 12 जाणण्याचे कारणाने
लाऊनि , बैसवी पाटी । मोक्षश्रियेच्या ।।46।।

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ।।2।।**
**हे ज्ञान सर्व गुह्यात राजा म्हणजे श्रेष्ठ,राजविद्या म्हणजे सर्व विद्यामध्ये श्रेष्ठ,उत्तम, प्रत्यक्ष बोध होणारे,आचरण्यास सुखकारक,अव्यय आणि धर्म्य आहे.**

जे जाणणेया [1] आघवेयांच्या [2] गावी । गुरुत्वाची [3] आचार्य पदवी । — 1 सूज्ञ 2 संपूर्ण 3 मोठेपणा
जे सकळ गुह्याचा गोसावी [4] । पवित्रां रावो ।।47।। — 4 स्वामी
आणि धर्माचे निजधाम ।तेवीची उत्तमाचे उत्तम ।
पै , जया येता , नाही काम । जन्मांतराचे ।।48।।
मोटके [5]गुरुमुखे उदैजत दिसें , । आणि ह्रदयी स्वयंभचि असें । — 5 थोडेसे
प्रत्यक्ष फावो[6] लागे तैसें ।आपैसयाचि ।।49।। — 6 प्राप्त होउ लागले की
तेवीचि गा ! सुखाच्या पाउटी । चढता , येइजे जयाच्या भेटी ।
मग , भेटल्या , कीर , मीठी । भोगणेयाही पडे ।।50।।
परि भोगाचिये ऐलीकडिलिये मेरे [7] । चित्त उभे ठेले , सुखा भरे । — 7 अलीकडील तीर
ऐसे सुलभ आणि सोपारे । वरि परब्रह्म ।। 51।।
पै गा ! आणिकही एक याचे , । जे , हाता आलिया तरी न वचे ।
आणि अनुभविता काही न वेचे [8]। वरि विटेहि ना ।।52।। — 8 खर्च होत नाही
येथ जरी तुं तार्किका ! । ऐसी हन घेसी शंका , ।
ना ,येवढी वस्तु , हे लोका । उरली केवि पां ? ।।53।।
जे एकोत्तरेयाचिया [9] वाढी , । जळतिये आगी घालिती उडी । — 9 एक टक्का व्याज
ते , ' अनायासे स्वगोडी ' । सांडिती केवी ?।।54।।
तरी पवित्र आणि रम्य । तेवीचि सुखोपाय गम्य ।
आणि स्वसुख परम धर्म्य । वरि आपणपां जोडे ।।55।।
ऐसा अवघाचि हा सुरवाडु आहे । तरी जना हाती केवि उरो लाहे ?।
हा शंकेचा ठावो , कीर , होये । परि न धरावी तुवां ।।56।।

**अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।**
**अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ।।3।।**
**या धर्मावर श्रद्धा न ठेवणारे पुरुष हे परंतपा! मला येऊन न मिळता मृत्युयुक्त संसाराच्या मार्गात परत येतात (म्हणजे त्यांना मोक्ष मिळत नाही)**

**पाहे पां ! दूध पवित्र आणि गोड । पासी त्वचेचिया पदराआड ।**
**परि , ते अव्हेरूनि , गोचिड । अशुद्ध काय न सेविती ?।।57।।**
**कां ,कमलकंदा आणि दर्दुरी [10] । नांदणुक एकेचि घरी ।** — 10 बेडुक
**परि परागु सेविजे भ्रमरी , । येरा , चिखलुचि उरे ।।58।।**

नातरी , निदैवाच्या परिवरी । लोह्या [1] रुतलिया आहाति सहस्त्रवरी । 1 मोहरा
परि तेथ बैसोनि , उपवासु करी । कां , दरिद्रे जिये ।।59।।
तैसा , हृदयामध्ये मी रामु ।असता , सर्वसुखाचा आरामु ।
की , भ्रांतासी कामु । विषयावरी ।।60 ।।
बहु मृगजळ देखोनि डोळा , । थुंकिजे अमृताचा गिळिता गळाळा [2] । 2 घोट
तोडिला परिसु बांधिला गळा । शुक्तिकालाभे[3] ।।61।। 3 शिंपी मिळवण्यासाठी
तैसी , अहंममतेचिये [4] लवडसवडी [5] । माते न पवतीची बापुडी । 4 मी व माझे ऐसा
म्हणौनि , जन्ममरणाची दुथडी । डहुळिते [6] ठेली ।।62।। समज 5 छंद 6 ढवळत
एऱ्हवी मी तरी कैसा ? । मुखाप्रति भानु का जैसा ।
कही दिसे , न दिसे ऐसा , । वाणीचा [7] नोहे ।।63।। 7 कमीपणा

**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।**
**मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ।।4।।**
**मी आपल्या अव्यक्त स्वरुपाने हे सर्व जग विस्तारले किंवा व्यापिले आहे. माझ्या ठायी सर्व भूते आहेत, मी त्यांच्या ठायी नाही**

माझेया विस्तारलेपणा नांवे । हे जगचि नोहे आघवे ! ।
जैसे , दूध मुराले स्वभावे । तरि तेचि दही ।।64।।
कां ,बीजचि जाहले तरु । अथवा भांगारचि [8] अळंकारु । 8 सोने
तैसा , मज एकाचा विस्तारु । ते हे जग ।।65।।
हे अव्यक्तपणे थिजले ।तेचि मग विश्वाकारे वोथिजले [9] । 9 पसरले
तैसे अमूर्तमूर्ति मिया विस्तारले । त्रैलोक्य ,जाणे ।।66।।
महदादि देहांते । इये अशेषेही भूते ।
परि माझ्या ठायी बिंबते , । जैसे , जळी फेण ।।67।।
परि तया फेणांआंतु पाहाता , । जेवी जळ न दिसें , पंडुसुता ! ।।
नातरी , स्वप्नीची अनेकता । चेइलिया नोहिजे ।।68।।
तैसी , भूते इये माझ्या ठायी।बिंबती ; तयामाजी मी नाही ।
इया उपपत्ती तुज , पाही , । सांगितलिया मागां ।।69।।
म्हणौनि,बोलिलिया बोलाचा अतिसो [10] । न कीजे,यालागी हे असो; । 10 पाल्हाळ
परी मज आंत पैसो [11] । दिठी तुझी ।।70।। 11 प्रवेशणे

**न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।**
**भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ।।5।।**
**आणि माझ्या ठायी सर्व भूतेहि नाहीत! पहा कशी ही माझी ईश्वरी करणी किंवा योगसामर्थ्य! भूते उत्पन्न करणारा माझा आत्मा भूते धारण करुनहि पुनः भूतात नाही!**

आमुचा प्रकृतीपैलीकडील भावो , । जरी कल्पनेवीण लागसी पाहो , ।
तरी मजमाजी भूते , हेही वावो । जें , ’ मी सर्व ’ म्हणौनि ।।+71।।
एऱ्हवी ,संकल्पाचिये सांजवेळे [1]। नावेक , तिमिरेजती बुद्धीचे डोळे [2]।
म्हणौनि , अखंडितचि ,परि झावळे , । भूतभिन्न ऐसे देखे ।।+72।।
तेचि , संकल्पाची सांज जै लोपे ,। तै , अखंडितचि आहे स्वरूपे ।
जैसे , शंका जातखेवो , लोपे। सापपण माळेचे ।।+ 73।।
एऱ्हवी तरी भूमीआंतूनि , स्वयंभ । काय , घडेगाडगेयाचे निघती कोंभ ? ।
परि ते कुलालमतीचे गर्भ [3] । उमटले की ।।+74।।
नातरी , सागरीच्या पाणी । काय तरंगाचिया आहाती खाणी ? ।
ते अवांतर करणी ।वारयाची नव्हे ?।।+75।।
पाहे पां ,कापसाच्या पोटी, । काय कापडाची होती पेटी ?।
तो वेढितयाचिया दिठी । कापड जाहला ।।+76।।
जरी सोने लेणे होउनि घडे , । तरी तयाचे सोनेपण न मोडे ।
येर , अळंकार हे वरचिलीकडे , । लेतयाचेनि भावे ।। +77।।
सांगे , पडिसादाची प्रत्युत्तरे , । कां , आरिसा जे अविष्करे ,।
ते आपले ? की साचोकारे । तेथेचि होते ?।।+78।।
तेसी , इये निर्मळे माझ्या स्वरुपी । जो भूतभावना आरोपी ।
तयासी , तयाच्या संकल्पी , । भूतभासु असे ।।+79।।
तेचि कल्पिती प्रकृती पुरे , । तरि भूताभासु आधीचि सरे ।
मग स्वरुप उरे एकसरे । निखळ माझें ।।+80।।
हे असो; आंगी भरलिया भवंडी [4] । जैशा भोवत दिसती अरडीदरडी [5] ।
तैशी आपुलिया कल्पना , अखंडी । गमती भूते ।। +81।।
तेचि कल्पना सांडूनि पाही , । तरि मी भूती , भूते माझिया ठायी , ।
’ हे ’ स्वप्नीही परि नाही । कल्पावयाजोगे ।।+82।।
आतां ,मीच एक भूतांते धर्ता । अथवा ; भूतामाजी मी असता ।
या , संकल्पसन्निपाता [6]। आंतुलिया, बोलिया ।।+83।।
म्हणौनि , परियेसी गा प्रियोत्तमा ! । यापरी मी विश्‍वेसी विश्‍वात्मा ।
जो इया लटकिया भूतग्रामा । भाव्यु सदा ।।+84।।
रश्मीचेनि आधारे ,जैसे ।नव्हे तेचि , मृगजळ आभासे ।
माझ्या ठायी भूतजात तैसें । आणि मातेही भावी ।।+85।।

1 परब्रह्माच्या विचारात अंधुकता आली की
2 बुद्धी नीट कार्य करित नाही
3 कुंभाराच्या बुध्दीचा आविष्कार
4 भोवळ 5 भिंती, नदीचा काठ वगैरे
6 त्रिदोष युक्त ज्वराच्या ग्लानीतील बडबड

मी, ये परीचा भूतभावनु । परि सर्व भूतासि अभिन्नु ।
जैसी , प्रभा आणि भानु । एकचि ते ।।+86।।
हा अमुचा ऐश्वर्ययोगु । तुवा देखिला की चांगु ? ।
आतां सांगे, ' काही एथ लागु । भूतभेदाचा असे ? ' ।।87।।
यालागी , मजपासूनि भूते । आने नव्हती , ' हे निरुते ' ।
आणि भूतावेगळिया माते । कहीच न मनी हो ! ।।88।।

**यथाऽऽकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।**
**तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ।।6।।**

**मी आपल्या अव्यक्त स्वरुपाने हे सर्व जग विस्तारिले किंवा व्यापिले आहे.माझ्या ठायी सर्व भूते आहेत,मी त्यांच्या ठायी नाही.**

पै , गगन जेवढे जैसे , । पवनुहि गगनी तेवढाचि असे ।
सहजे हालविलिया , वेगळा दिसें , । एऱ्हवी गगन तेचि , तो ।।89।।
तैसे , भूतजात माझ्या ठायी । कल्पिजे , तरी आभासे कांहीं ;।
निर्विकल्पी तरी नाही ,। तेथ , मीचि मी आघवे ।।90।।
म्हणौनि , नाही आणि असे , । हे कल्पनेचेनि सौरसे [1] । 1 बळाने
जे , कल्पनालोपे भ्रंशे , । आणि कल्पनेसवे होय ।।91।।
तेचि कल्पिते मुद्दल जाये [2], । तै ' असे नाही ' हे के आहे ? । 2 मुळातच
म्हणौनि , पुढती तूं पाहे । हा ऐश्वर्ययोगु ।।92।।
ऐसिया प्रतीति बोध सागरी [3] ।तूं आपणेयाते कल्लोळु एक करी । 3 अनुभवामुळे झालेल्या
मग ,जंव पाहासी चराचरी , । तंव ,' तूचि ' आहासी ।।93।। ज्ञानरुपी सागरात
' या जाणणेयाचा चेवो ।तुज आला ना ! ' म्हणती देवो ।
तरी आतां , द्वैत स्वप्न वावो । जाले की ना ? ।।94।।
तरी पुढती जरी विपाये , । बुद्धीसी कल्पनेची झोप ये , ।
तरी , अभेदबोधु जाये , । जै स्वप्नी पडिजें ।।95।।
म्हणौनि,ये निद्रेची वाट मोडे ,।निखिळ उद्‌बोधाचेचि [4] आपणपे घडे,। 4 अनुभव
ऐसे वर्म जे आहे फुडे , । ते दावो आतां ।।96।।
तरी धनुर्धरा धैर्या ! । निके अवधान देई , बा धनंजया ! ।
पै ,सर्व भुताते , माया । करी , हरी गा ! ।।97।।

**सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम् ।**
**कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ।।7।।**

**कल्पान्ती सर्व भूते हे कौंतेया! माझ्या प्रकृतीस येऊन मिळतात ,आणि कल्पारंभी म्हणजे ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या आरंभी मीच त्यांना पुनः निर्माण करितो**

जिये नांव गा प्रकृती , । जे द्विविधा सांगितली तुजप्रती ।
एकी , अष्टधा भेदव्यक्ती [1] , । दुजी जीवरूपा ।।98।। 1 भेद सांगितला
हा प्रकृतीविखो आघवा । तुवां मागा परिसिलासी पांडवा ।
म्हणौनि ; असो काई सांगावा । पुढतपुढती ।।99।।
तरी ये माझिये प्रकृती , । महाकल्पाच्या अंती ,।
सर्व भूते अव्यक्ती । ऐक्यासि येती ।।100।।
ग्रीष्माच्या अतिरसी [2] । सबीजे तृणे जैसी । 2 प्रखर
मागुती भूमीसी । सुलीने [3] होती ।।101।। 3 मिळतात
**कां वार्षिये ढेंढे [4] फिटे,। जेंव्हा शारदीयेचा अनुघडु [5] फुटे ।** 4 अवडंबर 5 संततधार
**तेव्हा घनजात आटे । गगनीचे गगनी ।।102।।**
नातरी ,आकाशाचे खोपे । वायु निवांतुचि लोपे ।
कां , तरंगता हारपे । जळी जेवीं ।।103।।
अथवा जागिनलिये वेळे , । स्वप्न मनीचे मनी मावळे ।
तैसे , प्राकृत प्रकृती मिळे । कल्पक्षयी ।।104।।
मग , कल्पादी पुढती । ' मीचि सृजी ' ऐसी वदंती ।
तरी इयेविषयी ' निरुती [6]। उपपत्ती ' आइके ।।105।। 6 स्पष्ट

**प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।**
**भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ।।8।।**
**मी प्रकृतीला हाती धरून त्या प्रकृतीच्या ताब्यात गेल्याने अवश म्हणजे परतंत्र अर्थात ज्याच्या त्याच्या कर्माने बद्ध झालेला हा भूतांचा समुदाय पुनः पुनः निर्माण करितो**

तरी हेचि प्रकृती ,किरीटी ! ।मी स्वकीया [7] सहजे अधिष्टी [8]। 5 आपल्या मायेने 6 धारण
तेथ तंतूसमवाय पटी , । जेवि विणावणी [7] दिसें ।।106।। करितो 7 विणकाम
मग तिये विणावणीचेनि आधारे , । लहाना चौकडिया पटत्व भरे ।
तैसी , पंचात्मके आकारे । प्रकृतीचि होय ।।107।।
जैसे , विरजणियाचेनि संगे , । दूधचि आटेजो लागे ।
तैशी , प्रकृति आंगा रिगे । सृष्टीपणाचिया ।।108।।
बीज जळाची जवळीक लाहे , । आणि तेचि शाखोपशाखी होये ।
तैसे मज करणे आहे । भूतांचे हें ।।109।।
अगा ! ' नगर हे राये केले ' । या म्हणणया साचपण , कीर , आले ।
परि निरुते पाहतां , काय सिणले । रायाचे हात ? ।।110।।
आणि मी प्रकृती अधिष्टी ,ते कैसे ? । जैसा स्वप्नी जो असें ।
मग तोचि प्रवेशे । जागृतावस्थे ।।111।।

तरी स्वप्नौनि जागृती येता , । काय पाय दुखती पंडुसुता ? ।
की , स्वप्नामाजी असता । प्रवासु होय ?।।112।।
या आघवियाचा अभिप्रावो कायी ? । जे हे भूतसृष्टीचे कांहीं ।
मज एकही करणे नाही , । ऐसाचि अर्थु ! ।।113।।
जैसी राये अधिष्टिली प्रजा । व्यापारे आपुलालिया काजा ।
तैसा प्रकृती संगु हा माझा ।येर , करणे ते इयेचे ।।114 ।।
पाहे पां ! पूर्णचंद्राचिये भेटी , । समुद्री अपार भरते दाटी ।
तेथ चंद्रासि काय , किरीटी ! । उपखा [1] पडे ?।।115।। 1 श्रम
जड, परि जवळिका, ।लोह चळे तरी चळो कां ? ।
तरि कवणु शीणु भ्रामका [2] । सन्निधानाचा [3] ? ।।116।। 2 लोहचुंबक 3 संगतीचा
किंबहुना , यापरी । मी निजप्रकृति अंगिकारी , ।
आणि भूतसृष्टी एकसरी । प्रसवोचि लागे ।।117।।
जो हा भूतग्रामु आघवा , । असे प्रकृतीआधीन पांडवा ! ।
जैसी , बीजाचिया वेलपालवा , । समर्थ भूमी ।।118।।
नातरी , बाळादिका वयसा , । गोसावी [4] देहसंगु जैसा । 4 महत्वाचे
अथवा , घनावळी आकाशा[5] , । वार्षिये [5] जेवीं ।।119।। 5 पावसाळी आभाळ 6 पावसाळा
कां , स्वप्नासि कारण निद्रा , । तैसी , प्रकृती हे नरेंद्रा ! ।
या अशेषाहि भूतसमुद्रा । गोसाविणी गा ! ।। 120 ।।
स्थावरा आणि जंगमा । स्थूळा अथवा सूक्ष्मा ।
हे असो ; भूतग्रामा । प्रकृतिचि मूळ ।।121।।
म्हणौनि , भूते हन सृजावी , । कां , सृजिली प्रतिपाळावी ।
इये करणी , न येती आघवी । आमुचिया आंगा ।।122।।
जळी चंद्रिकेचिया पसरती वेली , । ते वाढी , चंद्रे नाही वाढविली ।
तेवी ,माते पावोनि , ठेली । दूरी कर्मे ।।123।।

**न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय ।**
**उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ।।9।।**

**पण हे धनंजया या सृष्टी निर्माण करण्याच्या कर्मात माझी आसक्ती नसून,मी उदासीनासारखा रहात असल्यामुळे ती कर्मे मला बंधक होत नाहीत.**

आणि सुटलिया सिंधुजळाचा लोटु , । न शके धरूं , सैंधवाचा घाटु ।
तेवि, सकळ कर्मा मीचि शेवटु,। ती काय बांधती माते ?।।124।। 7 धूरातील लहान कणांचा
धूम्ररजांची पिंजरी [7] ।वाजतिया [8] वायूते जरी होकारी [9] ? । पिंजरा
कां ,सूर्यबिंबामाझारी । आंधारे शिरे ?।।125।। 8 जोराचा वारा 9 रोखु शकेल

हे असो ; पर्वताचिये हृदयीचे ।जेवि , पर्जन्य धारास्तव न खोचे [1]।	1 रुपणे
तेवि , कर्मजात प्रकृतीचे,। न लगे मज ।।126।।
एऱ्हवी , इये प्रकृतिविकारी । एकु मीचि असे , अवधारी ।
परि उदासीनाचिया परी , । करी , ना करवी ।।127।।
जैसा , दीपु ठेविला परिवरी , । कवणाते नियमी , ना निवारी ।
आणि कवण, कवणिये व्यापारी । राहाटे , तेहि नेणे ।।128।।
तो जैसा कां साक्षिभूतु । गृहव्यापारप्रवृत्तिहेतु ।
तैसा , भूतकर्मी अनासक्तु । मी ; भूती असे ।।129।।
हा एकचि अभिप्रावो पुढतपुढती । काय सांगो बहुतां उपपत्ती ! ।
येथ एकहेळा सुभद्रापती । येतुले जाण पां ! ।।130।।

**मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**
**हेतुनाऽनेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ।।10।।**

**मी अध्यक्ष होऊन प्रकृतीकडून सर्व चराचर सृष्टी प्रसवितो.या कारणामुळे हे कौंतेया! जगाची ही घडामोड चालली आहे.**

जे , लोकचेष्टा समस्तां , । जैसा , निमित्तमात्र कां सविता , ।
तैसा ,जगत्प्रभवी पंडुसुता । हेतु मी जाणे ।।131।।
कां,जे मिया अधिष्टिलिया प्रकृती । होती चराचराचिया संभूती [2] ।	2 उत्पपत्ती
म्हणौनि , ' मी हेतु ' हे उपपत्ती [3] । घडे यया ।।132।।	3 युक्तीवाद
आता येणे उजिवडे [4] निरुते [5] । न्याहाळी पां ! ऐश्वर्ययोगाते ।	4 प्रकाशात 5 निश्चित
जे , माझ्या ठायी भूते , । परी , भूती मी नसे ।।133।।
अथवा भूते ना माझ्या ठायी । आणि भूतामाजी मी नाही ।
या खुणा तू कही । चुको नको ।।134।।
हे सर्वस्व आमुचे गूढ । परि दाविले तुज उघड ।
आता इंद्रिया देऊनि कवाड , । हृदयी भोगी ।।135।।
हा दंशु [6] जव नये हाता , । तव माझे साचोकारपण [7] ,पार्था ! ।	6 वर्म 7 यथार्थ
न संपडे गा सर्वथा । जेवी , तुषी [8] कणु ।।136।।	स्वरुपाने 8 कोंडा
एऱ्हवी , अनुमानाचेनि पैसे [9] । आवडे [10] कीर 'कळले ऐसें , ।	9 तर्क केला असता
परि , मृगजळाचेनि वोलांशे , । काय भूमि तिमे [11] ? ।।137।।	10 भासते 11 भिजते
जे , जाळ जळी पांगिले । तेथ चंद्रबिंब दिसे आतुडले ।
परि थडिये काढूनि झाडिले । तेव्हा बिंब के ? सांगै ! ।।138।।
तैसे , बोलवरी वाचाबळे , ।वायाचि झकविजती प्रतीतीचे डोळे ।
मग ,साचोकारे बोधावेळे । आथि ना होईजें ।।139।।

**अवजानन्ति मां मूढा मानुषी तनुमाश्रितम् ।**
**परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।11।।**

**सर्व भूतांचा मोठा ईश्वर असे जे माझे परम स्वरुप ते न जाणणारे मूढ लोक मनष्यदेह धारण केलेल्या मला मनुष्य देहधारी समजून अवमानितात.**

किबहुना,भवा बिहाया [1] । आणि साचे चाड आथि जरी मिया [2] ,। 1 संसाराच्या भीतीने
तरि तू गा उपपत्ती इया । जतन कीजे ।।140।। 2 माझी खरी आवड असेल
एऱ्हवी , दिठी वेधली [3] कवळे , ।तै चांदणियाते म्हणे पिवळे । तर 3 कावीळीने व्यापली
तेवि, माझ्या स्वरूपी निर्मळे, । देखती दोष ।।141।।
नातरी , ज्वरे विटाळले मुख , । ते दुधाते म्हणे कडु विख ।
तेवि , अमानुषा , मानुष । मानिती माते ।।142।।
म्हणौनि,पुढतपुढती धनंजया ! । झणे [4] विसंबसी, या अभिप्राया । 4 नको
जे इया स्थूलदृष्टी , वाया ।जाइजेल गा ! ।।143।।
पै , स्थूलदृष्टी देखती माते , । तेचि न देखणे , जाण निरुते ।
जैसे , स्वप्नीचेनि अमृते , । अमरा नोहिजें।।144 ।।
एऱ्हवी , स्थूलदृष्टी, मूढ ।माते जाणती, कीर, दृढ ।
परि , ते जाणणेचि , जाणणेया आड । रिगोनि ठाके ।।145।।
जैसा , नक्षत्राचिया आभासा- । साठी , घातु झाला तया हंसा , ।
माजी रत्नबुद्धीचिया आशा । रिगोनिया ।।146।।
सांगै ! गंगा या बुध्दी , मृगजळ ।ठाकोनि आलियाचे , कवण फळ ? ।
काय , सुरतरु [5] म्हणौनि बाबुळ । सेविली करी[6] ? ।।147।। 5 कल्पवृक्ष 6 अर्चना करणे
हार निळयाचाचि दुसरा , । या बुद्धी , हातु घातला विखारा [7] , । 7 विषारी निळा साप
कां , रत्ने म्हणौनि गारा । वेचि जेवी ।। 148।।
अथवा,निधान हे प्रगटले,। म्हणौनि खदिरांगार [8] खोळे भरिले । 8 निखारे
का , साउली नेणता घातले ।कुहा [9] , सिंहे ।।149।। 9 विहीर
तेवी , मी म्हणौनि , प्रपंची । जिही बुडी दिधली कृतनिश्चयाची , ।
तिही चंद्रासाठी, जेवी, जळीची । प्रतिभा धरिली ।।150।।
तैसा,कृतनिश्चयो वाया गेला । जैसा , कोण्ही एकु कांजी प्याला , ।
मग परिणाम पाहो लागला । अमृताचा ।।151।।
तैसे , स्थूलाकारी नाशिवंते , । भरंवसा बांधोनि चित्ते , ।
पाहती मज अविनाशाते, । तरी कैचा दिसें ? ।।152।।
आगा ! काई पश्चिमसमुद्राचिया तटा । निघिजत आहे पूर्विलिया वाटा ? ।
कां , कोंडा कांडता , सुभटा ! । कणु आतुडे [10] ? ।।153।। 10 सापडणे

तैसे , विकारले हे स्थूळ , । जाणितलेया मी, जाणवतसे केवळ ।
काई फेण पितां जळ ।सेविले होय ?।।154।।
म्हणौनि , मोहिलेनि मनोधर्मे ।' हेचि मी' मानूनि संभ्रमे , ।
मग येथिची जिये जन्मकर्मे , । तिये मजचि म्हणति ।। 155।।
येतुलेनि , अनामा नाम । मज अक्रियासि कर्म ।
विदेहासि देहधर्म । आरोपिती ।। 156।।
मज आकारशून्या आकारु । निरुपाधिका उपचारु ।
मज विधिवर्जिता [1] व्यवहारु । आचारादिक ।।157।।
1 शास्त्रमर्यादेचे बंधन नसलेला
मज वर्णहीना वर्णु । गुणातीतासि गुणु ।
मज अचरणा चरणु । अपाणिया पाणी ।।158।।
मज अमेया [2] मान । सर्वगतासी स्थान ।
2 अमर्याद
जैसे , सेजेमाजी [3] वन । निदेला देखे ।।159।।
3 झोपलेला
तैसे अश्रवणा श्रोत्र । मज अचक्षुसी नेत्र ।
अगोत्रा गोत्र।अरूपा रूप।। 160।।
मज अव्यक्तासी व्यक्ती । अनार्तासी आर्ती ।
स्वयंतृप्ता तृप्ती । भाविती गा ! ।। 161 ।।
मज अनावरणा प्रावरण । भूषणातीतासी भूषण ।
मज सकळ कारणा कारण । देखती ते ।। 162।।
मज सहजाते [4] करिती । स्वयंभाते प्रतिष्ठीती ।
4 नित्य असलेला
निरंतराते आव्हानिती । विसर्जिती गा ! ।।163।।
मी सर्वदा स्वतः सिद्‌धु । तो की बाळ तरुण वृद्‌धु ।
मज एकरुपा संबंधु । जाणती ऐसे ।।164।।
मज अद्वैतासि दुजें । मज अकर्तयासि काजे ।
मी अभोक्ता की भुंजे । ऐसे म्हणती ।।165।।
मज अकुळाचे कुळ वानिती । मज नित्याचेनि निधने शिणती ।
मज सर्वांतराते [5] कल्पिती । अरि मित्र गा ।।166।।
5 सर्वत्र असलेल्या
मी स्वानंदाभिरामु । तया मज अनेक सुखाचा कामु ।
आघवाचि मी असे समु । की म्हणती एकदेशी ।।167।।
मी आत्मा एक चराचरी । म्हणती एकाचा कैपक्ष [6] करी ।
6 कैवार
आणि कोपोनि एकाते मारी । हेचि वाढविती ।।168।।
किंबहुना ऐसे समस्त । जे हे मानुषधर्म प्राकृत ।
तयाचि नांव ' मी ' ऐसे विपरीत । ज्ञान तयांचे ।।169।।
जव आकारु एक पुढा देखती , । तव,' हा देव ' , येणे भावे भजती ।
मग तोचि विघडलिया , टाकिती , । नाही म्हणौनि ।।170।।

माते येणे  येणे प्रकारे।जाणती मनुष्य , ऐसेनि आकारे ।
म्हणौनि , ज्ञानचि ते आंधारे [1] ।ज्ञानासि करी ।।171 ।।    1 झाकोळते

**मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ।**
**राक्षसीमासुरी चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ।।12।।**

**त्यांच्या आशा व्यर्थ,कर्मे फुकट,ज्ञान वांझ,आणि चित्त भ्रष्ट असून त्यांनी मोहात्मक राक्षसी व आसुरी स्वभावाचा आश्रय केलेला असतो.**

यालागी जन्मलेचि ते मोघ [2] । जैसे , वार्षियेवीण मेघ ।    2 व्यर्थ
कां मृगजळाचे तरंग , । दुरुनीचि पाहावे ।।172।।
अथवा कोल्हेरीचे असिवार [3] । नातरी,वोडंबरीचे[4] अळंकार ।    3 मातीचे घोडेस्वार 4 गारुडी विद्या
की गंधर्वनगरीचे [5] आवार । आभासती कां।।173।।    5 आकाशात ढगाचे
साबरी [6] वाढिन्नल्या सरळा , । वरी फळ ना , आतु पोकळा ।    आकाराने दिसणारा शहराचा
कां , स्तन जाले गळां । शेळिये जैसे ।।174।।    भास 6 काटेनिवडुंग
तैसे मूर्खाचे तया जियाले । आणि धिग्[7] कर्म तयांचे निपजले ।    7 धिक्कार असो
जैसे साबरी फळ आलें। घेपे ना दीजे ।।175।।
मग जे काही ते पढिन्नले , । ते मर्कटे नारळ तोडिले ।
कां , आंधळ्या हाती पडिले । मोती जैसे ।।176।।
किंबहुना,तयांची शास्त्रे,। जैशी कुमारी हाती दिधली शस्त्रे ।
कां , अशौच्या [8]मंत्रे । बीजे , कथिली ।।177।    8 अपवित्र
तैसे,ज्ञानजात तयां । आणि जे काही आचरले गा धनंजया ! ।
ते आघवेचि गेले वायां । जे चित्तहीन ।।178।।
पै , तमोगुणाची राक्षसी । जे सद् बुद्धीते ग्रासी ।
विवेकाचा ठावोचि पुसी । निशाचरी जे ।।179 ।।
तिये प्रकृती वरपडे [9] जाले । म्हणौनि चिंतेचेनि कपोले [10] गेलें ।    9 आधीन 10 छिन्नविछिन्न झाले
वरि तामसीयेचिये पडिले । मुखामाजी ।।180।।
जेथ आशेचिये लाळे । आतु, हिंसा जीभ लोळे ।
तेवीचि असंतोषाचे चाकळे [11] । अखंड चघळी ।।181।।    11 चोथा
जे अनर्थाचे कानवेरी [12] ।आवाळुवे [13] चाटीत निघे बाहेरी ।    12 कानापर्यंत 13 ओठांचे काठ
जे प्रमादपर्वतीची दरी । सदाचि मातली ।।182।।
जेथ द्वेषाचिया दाढा । खसखसा ज्ञानाचा करिती रगडा ।
जे अगस्ती गवसणी मूढा [14] । स्थुल बुद्धि ।।+183।।    14 अगस्ती ऋषीला आवरण
ऐसे, आसुरिये प्रकृतीचे तोंडी । जे जाले गा भूतोंडी [15] ।    असलेला कुंभ 15 भुताला
ते बुडोनि गेले कुंडी । व्यामोहाच्या [16]।।184।।    टाकलेला बळी 16 भ्रांतीने

एवं तमाचिये पडिले गर्ते , । न पविजतीचि विचाराचेनि हाते ।
हे असो ; ते गेले जेथे , । ते शुद्धीचि नाही ।। 185।।
म्हणौनि , असोतु इये वायाणी , । कायशी मुर्खाची बोलणी ! ।
वाया वाढविता , वाणी । शिणेल, हन ।।186।।
ऐसे बोलिले देवे । तेथ , ' जी , जी , ' म्हणितले पांडवे ।
' आइके , जेथ वाचा विसवे । ते साधुकथा ' ।।187।।

**महात्मानस्तु मां पार्थ दैवी प्रकृतिमाश्रिताः ।**
**भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।।13।।**
**परंतु दैवी प्रकृतीचा आश्रय करून राहिलेले महात्मे हे पार्था!सर्व भुतांचे अव्यय आदिस्थान जो मी त्या मला ओळखून अनन्यभाव होत्साते माझे भजन करितात.**

तरी जयाचे चोखटे मानसी , । मी होऊनि असे क्षेत्रसंन्यासी ।
जया निजेलियाते , उपासी । वैराग्य गा ।।188।।
जयाचिया अस्थेचिया सद्भावा । आतु , धर्म करी राणिवा ।
जयाचे मन ओलावा , । विवेकासी ।।189।।
जे ज्ञानगंगे नाहाले । पूर्णता जेऊनि धाले[1] । — 1 तृप्त झाले
जे शांतीसी आले । पालव नवे ।।190।।
जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ ।
जे आनंदसमुद्री कुंभ । चुबकळोनि[2] भरिले ।।191।। — 2 बुचकुळुन
जया, भक्तीची येतुली प्राप्ती,।जे, कैवल्याते ' परौते सर ' म्हणती ।
जयांचिये लीलेमाजी , नीती । जियाली दिसें ।।192।।
जे आघवाचि करणी[3] । लेइले शांतीची लेणी । — 3 इंद्रियांना
जयांचे चित्त गवसणी । व्यापका मज ।।193।।
ऐसे जे महानुभाव । दैविये प्रकृतीचे दैव ।
जे जाणोनिया सर्व । स्वरूप माझें ।।194।।
मग वाढतेनि प्रेमे , । माते भजती जे महात्मे ।
परि दुजेपण , मनोधर्मे । शिवतले नाही ।।195।।
ऐसे मीच होऊनि , पांडवा ! । करिती माझी सेवा ।
परि नवलावो तो सांगावा । असे , आइक ! ।।196।।

**सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।**
**नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।।14।।**
**आणि यत्नशील,दृढव्रत,आणि नित्य योगयुक्त होत्साते माझे सतत कीर्तन व वंदन करीत भक्तीने माझी उपासना चालवितात.**

तरी कीर्तनाचेनि नटनाचे [1] , । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे , । 1 उत्कर्षाने
जे ,नामचि नाही पापाचे , । ऐसे केले ।।197।।
यमदमा अवकळा आणिली । तीर्थे ठायावरूनि उठविली ।
यमलोकीची खुंटिली ।राहाटी आघवी ।।198।।
यमु म्हणे , काय यमावे ? । दमु म्हणे , कवणाते दमावे ? ।
तीर्थे म्हणती , काय खावे ? । दोष ओखदासि नाही[2] ।।199।। 2 औषधाकरिताहि
ऐसे माझेनि नामघोषे , । नाहीचि करिती विश्वाची दुःखे । दोष सापडत नाही
अवघे जगचि महासुखे । दुमदुमित भरले ।।200।।
ते पाहांटेवीण पाहावित , । अमृतेवीण जीववित ।
योगेवीण दावित । कैवल्य डोळा ।।201।।
परी राया रंका पाड [3] धरु ।नेणती, सानेया थोरा कडसणी [4] करु । 3 अंतर 4 निवड
एकसरे आनंदाचे आवारु । होत जगा ।। 202।।
कही एकाधेनि वैकुंठा जावे , । ते , तिही वैकुंठचि केले आघवे ।
ऐसे नामघोषगौरवे । धवळले विश्व ।।203।।
तेजे सूर्य , तैसे सोज्वळ । परि , तोहि अस्तवे हे किडाळ [5]। 5 दोष
चंद्र संपूर्ण एखादे वेळ , । हे सदा पुरते ।।204।।
मेघ उदार , परी वोसरे । म्हणौनि , उपमेसी न पुरे ।
हे निःशंकपणे सपांखरे [6] । पंचानन [7] ।।205।। 6 कृपाळु 7 सिंह
जयाचे वाचेपुढा भोजे [8] । नाम नाचत असे माझें , । 8 प्रेमाने
जे, जन्मसहस्त्री वोळगिजे[9] । एकवेळ यावया ।।206।। 9 सेवा करणे
तो मी , वैकुंठी नसे । वेळु एक , भानुबिंबीही न दिसें , ।
वरी योगियांचीही मानसे ।उमरडोनि [10] जाय ।।207।। 10 ओलांडुन जाणे
परी तयापाशी , पांडवा ! । मी हारपला गिवसावा ।
जेथ नामघोषु बरवा । करिती माझा ।।208।।
कैसे माझ्या गुणी धाले[11] ! । देशकालाते विसरले ! । 11 तृप्त झाले
कीर्तने सुखी झाले । आपणपांचि ! ।।209।।
' कृष्ण विष्णु हरि गोविंद ' । या नामाचे निखळ प्रबंध ।
माजी , आत्मचर्चा विशद [12] । उदंड गाती ।।210।। 12 विशुद्ध
हे बहु असो ; यापरी ।कीर्तित माते , अवधारी , ।
एक विचरती [13] चराचरी । पंडुकुमरा ।।211।। 13 संचार करितात
मग आणिक ते अर्जुना ! । साविया[14] बहुवा जतना , । 14 स्वभावतः
पंचप्राण मना । पाढाऊ [50] घेउनी, ।।212।। 15वाटाड्या
बाहेरी यमनियांची कांटी लाविली ।आतु वज्रासनाची पौळी पन्नासिली [16]।16 कोट तयार करणे
वरी प्राणायामाची मांडिली ।वाहाती यंत्रे [17] ।।+ 213।। 17 चालु असणारी तोफ

येथ उल्हाट शक्तीचेनि उजिवडे [1] । मन पवनाचेनि सुरवाडे [2] ।
सतरावियेचे पाणियाडे [3] । बळियाविले ।।214।।
तेव्हा प्रत्याहारे [4] ख्याती केली । विकारांची सपिली बोहली [5] ।
इंद्रये बांधोनि आणिली । ह्रदयाआंतु ।।215।।
तंव धारणावारु दाटिन्नले । महाभूताते एकवटिले ।
मग चतुरंग सैन्य निवटिले [6] । संकल्पाचे ।। 216।।
तयावरी , ' जैत रे जैत ' । म्हणौनि ध्यानाचे निशाण वाजत ।
दिसे , तन्मयाचे , झळकत । एकछत्र ।।217।।
पाठी समाधिश्रियेचा, अशेखा । आत्मानुभव राज्यसुखा, ।
पट्टाभिषेकु देखा ।समरसे जाहला ।।+218।।
ऐसे हे गहन । अर्जुना ! माझे भजन ।
आता ऐके सांगेन । जे करिती एक ।।219।।
तरी दोन्ही पालववेरी [7] । जैसा एक तंतू अंबरी [8] ।
तैसा मीवाचूनि चराचरी।जाणती ना।।220।।
आदि ब्रह्मा [9] करुनी। शेवटी मशक धरूनी।
माजी समस्त , हे जाणोनि । स्वरूप माझे ।।221।
मग , वाड धाकुटे न म्हणती , । सजीव निर्जीव नेणती ।
देखिलिये वस्तु उजु , लुंटिती [10] । मीचि म्हणौनि ।।222।।
आपुले उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य नेणवे ।
एकसरे व्यक्तिमात्राचेनि नांवे । नमुचि आवडे ।।223।।
जैसे उंची उदक पडिले , । ते तळवटवरी ये उगेलें [11] ।
तैसे,नमिजे भूतजात देखिले,। ऐसा,स्वभावोचि तयांचा ।।224।।
कां ,फळलिया तरुची शाखा ।सहजे भूमीसी उतरे , देखा ! ।
तैसे , जीवमात्रां अशेखा । खालावती [12] ते ।।225।।
अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची , विनय , हेचि संपत्ती ।
जे जय जय मंत्रे अर्पिती । माझ्याचि ठायी ।।226।।
नमितां , मानापमान गळाले । म्हणौनि , अवचितां मीचि जहाले ।
ऐसे, निरंतर मिसळले ,। उपासिती ।। 227।।
अर्जुना ! हे गुरुवी भक्ती । सांगितली तुजप्रती ।
आतां ज्ञानयज्ञे यजिती । ते भक्त आइके ।।228।।
परि भजन करिती हातवटी । तू जाणत आहासि किरीटी ।
जे मागां इया गोष्टी । केलिया आम्ही ।।229।।
तंव,' आथि जी ' अर्जुन म्हणे । ' हे दैविकिया प्रसादाचे करणे,।
तरि , काय अमृताचे अरोगणे[13] । पुरे म्हणवे ? ' ।।230।।

1 कुंडलीनेचे प्रकाशात
2 अनुकुलता 3 व्योमचक्रातील
चंद्ररुपी जीवन कलेचे तळे
4 इंद्रियांची अंर्तमुखता
5 बोलणे बंद झाले
6 मन,बुद्ध,चित्त व
अहंकार नष्ट केले
7 दोन्ही पदरापर्यंत
8 वस्त्रामध्ये
9 ब्रह्मदेवापासून
सुरवात करून
10 सरळ लोटांगण घालतात
11 विनायासे
12 नम्र होतात
13 वाढणे

या बोला , श्रीअनंते । लागटा [1] देखिले तयांते । 1 प्रेमाने
की सुखावलेनि चित्ते । डोलतु असें ।।231।।
म्हणे , ' भले केले पार्था ! ।एऱ्हवी , हा अनवसरु सर्वथा ।
परि , बोलवीतसे आस्था । तुझी , माते ' ।।232।।
तंव अर्जुन म्हणे , ' हे कायी ! । चकोरेवीण चांदणेचि नाही ? ।
जगचि निवविजे , हा तयाच्या ठायी ।स्वभावो , की जी ! ।। 233।।
येरे चकोरे , तिये , आपुलिये चाडे , । चांचु करिती चंद्राकडे ? ।
तेवी आम्ही विनवूं , ते थोकडे [2] ।देवो कृपासिंधु ।।234।। 2 क्षुद्र
जी ! मेघु आपुलिये प्रौढी [3] । जगाची आर्ती [4]दवडी । 3 मनाच्या मोठेपणाने 4 तहान
वाचूनि , चातकाची ताहान केवढी ?। तो वर्षावो पाहुनी ।।235।।
परि , चुळा एकाचिया चाडे[4] , । जेवी गंगेतेचि ठाकणे पडे[5] । 4 चूळभर पाण्याकरिता
तेवी , आर्त, बहु कां थोडे , ।तरी , सांगावे देवे ' ।।236।। 5 गंगेपर्यंत जावे लागते
तेथे देवे म्हणितले , ' राहे । जो संतोषु आम्हा जाहला आहे ।
तयावरी स्तुति साहे । ऐसे उरले नाही ।।237।।
पे,परिसतु आहासि निकियापरी,।तेचि वक्तृत्वा वऱ्हाडिक [6] करी ' । 6 उत्साह देतो
ऐसे पुरस्करोनि [7] , श्रीहरी । आदरिले [8] बोलो ।।238।। 7 गौरवून 8 आरंभ केला

**ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते ।**
**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ।।15।।**

**तसेच दुसरे कित्येक सर्वतोमुख जो मी,त्या माझे एकत्वाने म्हणजे अभेदभावाने, पृथक्त्वाने म्हणजे भेदभावाने,किंवा बहुतप्रकारे ज्ञानयज्ञाने यजन करून उपासना करीत असतात.**

तरी ज्ञानयज्ञु , तो एवं रुपु ;। जेथ आदिसंकल्पु हा युपु [9] । 8 यज्ञातील खांब
महाभूते मंडपु । भेदु तो पशु ।।+239।।
मग पांचाचे जे विशेष गुण । अथवा इंद्रिये आणि प्राण ।
हेचि यज्ञोपचारभरण [10] । अज्ञान घृत ।।+240।। 10 यज्ञातील साधन सामुग्री
तेथ मनबुद्धीचिया कुंडा-। आंतु ज्ञानाग्निी धडफुडा [11] । 11 प्रज्वलीत
साम्य तेचि सुहाडा [12] । वेदिका जाणे ।।+241।। 12 मित्रा
सविवेकमतिपाटव [13] । तेचि मंत्रविद्यागौरव । 13 आत्मानात्म विचार करण्याची
शांती स्त्रुक् स्त्रुव [14] । जीवु यज्वा[15] ।।+242।। बुद्धीची कुशलता 14 यज्ञात तुप
तो प्रतीतीचेनि पात्रे । विवेकमहामंत्रे । टाकण्याचे भांडे 15 यज्ञ करणारा
ज्ञानाग्निीहोत्रे । भेदु नाशी ।।+243।
तेथ अज्ञान सरोनि जाये । आणि यजिता यजन हे ठाये [16]। 16 संपते
आत्मसमरसी न्हाये ।अवभृथी [17] जेंव्हा ।।+244।। 17 यज्ञसमाप्तीचे शेवटचे स्नान

तेव्हा भूते , विषय, करणे [1] । हे वेगळाले , काही न म्हणे । 1 इंद्रिये
आघवे एकचि , ऐसे जाणे । आत्मबुद्धी ।।+245।।
जैसा चेइला , तो , अर्जुना ! ।म्हणे , स्वप्नीची हे विचित्र सेना ।
मीचि जाहालो होतो ना ! ।निद्रावशे ।।246।।
आता सेना , ते सेना नव्हे , । हे , मीच एक आघवे ।
ऐसे एकत्वे मानवे [2] ।विश्व तया ।।247।। 2 समजते
मग तो जीवु , हे भाष सरे । आब्रह्म परमात्मबोधे भरे ।
ऐसे भजती ज्ञानाध्वरे [3] । एकत्वे येणे ।।248।। 3 ज्ञानयज्ञाने
अथवा, अनादि हे, अनेक ।जे, आनासारिखे एका, एक । 4 हे विश्व अनादि आहे
आणि नामरुपादिक । तेही विषम ।।249।।
म्हणौनि विश्व भिन्न ; ।परि , न भेदे तयाचे ज्ञान ।
जैसे , अवयव तरि आन , आन ,।परि एकेचि देहीचे ।।250।।
कां ,शाखा सानिया, थोरा,। परि आहाति एकाचिया तरुवरा ।
बहु रश्मि [5] परि दिनकरा । एकाचे जेवीं ।।251।। 5 किरणे खूप आहेत
तेवी नानाविधा व्यक्ती । आनाने नामे , आनानी वृत्ती ।
ऐसे जाणती , भेदला भूती , । अभेदा माते ।।252।।
येणे वेगळालेपणे पांडवा ! । करिती ज्ञानयज्ञु बरवा ।
जे न भेदती जाणिवा,। जाणते म्हणौनि ।।253 ।।
ना तरी , जेधवा , जिये ठायी , ।देखती कां ,जे , जे ,कांही ।
ते , मीवाचूनि नाही । ऐसाचि बोधु ।। 254।।
पाहे पां ! बुडबुडा जेउता जाये ।तेउते जळचि एक तया आहे ।
मग विरे अथवा राहे , । तऱ्ही जळाचिमाजी ।।255।।
कां , पवने परमाणु उचलले । ते पृथ्वीपणावेगळे नाही केले ।
आणि माघौते जरी पडले । तरी पृथ्वीचिवरी ।।256।।
तैसें , भलतेथ भलतेणे भावे । भलतेही हो , अथवा नोहावे ।
परि ते ’ मी’ ऐसे आघवे । होऊनि ठेले ।।257।।
अगा ! हे जेव्हडी माझी व्याप्ती , । तेव्हडीचि तयांची प्रतीती ।
ऐसे बहुधाकारी वर्तती । बहुचि होउनि ।।258।।
हे भानुबिंब , आवडे तया [6] । सन्मुख जैसे धनंजया ! । 6 पाहिजें त्याला
तैसे , ते विश्वा यया । समोर सदा ।।259।।
अगा ! तयांचिया ज्ञाना , ।पाठी पोट नाही अर्जुना ! ।
वायु जैसा गगना । सर्वांगी असें ।।260।।
तैसा , मी जेतुला आघवा ।तेचि तुक [7] तयाचिया सद्‌भावा। 7 माप
तरी न करिता , पांडवा ! ।भजन जहाले ।। 261।।

एऱ्हवी,तरी सकळ मीचि आहे ।तरी कवणी,के,उपासिला नोहे ?।
एथ,एके जाणणेवीण ठाये [1],। अप्राप्तासी ।।262।। 1 सर्वव्यापक ज्ञान नसल्यामुळे
परि ते असो ; येणे उचिते । ज्ञानयज्ञे यजित सांते [2] । 2 उपासना केली जाते ती
उपासिती माते । ते सांगितले ।।263।।
अखंड सकळ हे सकळा मुखी । सहज अर्पत असे मज एकीं ।
की नेणणे , यासाठी मूर्खी । न पविजेचि माते ।।264।।

**अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाऽहमहमौषधम् ।**
**मन्त्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ।।16।।**
**क्रतु म्हणजे श्रौत यज्ञ मी,यज्ञ म्हणजे स्मार्त यज्ञ मी,स्वधा म्हणजे श्राद्धांत पितरांस अर्पण केलेले अन्न मी,औषध म्हणजे वनस्पतीपासून यज्ञार्थ उत्पन्न झालेले अन्न मी,यज्ञात हवन करिताना म्हणतात ते मंत्र मी,तूप मी,अग्नि मी,आणि अग्नीत टाकिलेल्या आहुती मीच.**

तोचि जाणिवेचा जरी उदयो होये , ।तरी मुद्दल वेदु , मीचि आहे ।
आणि तो विधानाते [3] जया विये , ।तो क्रतुही [4] मीच ।।265।। 3 क्रिया 4 श्रौत यज्ञ
मग , तया कर्मापासूनि बरवा ।जो सांगोपांगु आघवा ।
यज्ञु प्रगटे , पांडवा ! । तोही मी गा ! ।।266।।
स्वाहा [5] मी स्वधा [6] ।सोमादि औषधी विविधा । 5 आहुतीचे अन्न 6 पिंड
आज्य [7] मी समिधा । मंत्रु मी हवि [8] । 7 तूप 8 होम द्रव्य
होता [9] मी हवन [10] कीजें । तेथ अग्नी , तो स्वरूप माझें । 10 यज्ञ करणारा 10 यज्ञ कर्म
आणि हुतक [11] वस्तु जे, जे , । तेही मीचि ।।268।। 11 हवन द्रव्य

**पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः ।**
**वेद्यं पवित्रमोंकार ऋक्साम यजुरेव च ।।17।।**
**या जगताचा पिता,माता,धाता (आधार) पितामह मी,जे काय पवित्र किंवा जे काही ज्ञेय आहे ते मी आणि ॐ कार,ऋग्वेद,सामवेद व यजुर्वेदहि मी,**

पै , जयाचेनि अंगसंगे । इये प्रकृतीस्तव अष्टांगे ।
जन्म पाविजत असे जगे , । तो पिता , मी गा ! ।। 269।।
अर्धनारीनटेश्वरी । जो पुरुष , तोचि नारी ।
तेवी मी चराचरी । माताही होय ।।270।।
आणि जाहाले जग जेथ राहे , । जेणे जीवित वाढत आहे , ।
ते ,मी वाचूनि नोहे । आन , निरुते ।। 271।।

इये प्रकृतिपुरुषे दोन्ही । उपजली जयाचिया अमनमनी [1] । 1 मनरहित स्वरूपात
तो पितामह त्रिभुवनी । विश्वाचा मी ।।272।।
आणि आघवेया जाणणेयाचिया वाटा,। जया गांवा येती,गा सुभटा ! ।
वेदाचिया चोहटा , । वेद्य जे म्हणिजे , ।।273।।
जेथ नानामता बुझावणी [2] जाहाली । एकमेका शास्त्रांची अनोळखी फिटली । 2 एकवाक्यता
चुकली ज्ञाने , जेथ मिळो आली । जे पवित्र म्हणिजे , ।।274।।
पै , ब्रह्मबीजा जाहला अंकुरु । घोषध्वनीनादाकारु , ।
तयाचे गा भुवन , जो ॐकारु , ।तोही , मी गा ! ।। 275।।
जया ॐ काराचिये कुशी , । अक्षरे होती अउमकारेसी [3]। 3 अकार,उकार व मकार
जिये, उपजत वेदेसी, । उठली तिन्ही ।।276।। या ॐ काराच्या तीन मात्रा
म्हणौनि , ऋग्यजुःसामु ।हे तीन्ही म्हणे 'मी' आत्मारामु ।
एवं मीचि कुलक्रमु । शब्दब्रह्माचा ।।277।।

**गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।**
**प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ।।18।।**

**सर्वांची गती,पोषक,प्रभु,साक्षी,निवास,शरण,सखा,उत्पत्ती,प्रलय,स्थिती,निधान आणि अव्यय बीजही मी**

हे चराचर आघवे , । जिये प्रकृती आत सांठवे ।
ते शिणली जेथ विसवे , । ते परमगती मी ।। 278।।
आणि जयाचेनि प्रकृती जिये , । जेणे अधिष्ठिली , विश्व विये , ।
जो येऊनि प्रकृती , इये । गुणाते भोगी , ।।279।।
तो विश्वश्रियेचा भर्ता । मीचि , गा ! एथ पंडुसुता ! ।
मी गोसावी असे समस्ता ।त्रैलोक्याचा ।।280।।
आकाशे सर्वत्र वसावे , । वायुने नावभरी [4] उगे नसावे , । 4 क्षणभर
पावके दाहावे । वर्षावे जळे ।।281।।
पर्वती बैसका न संडावी , । समुद्री रेखा नोलांडावी , ।
पृथ्वीया भूते वाहावी , । हे आज्ञा माझी ।।282।।
म्या बोलविल्या वेदु बोले , । म्या चालविल्या सूर्यु चाले , ।
म्या हालविल्या प्राणु हाले , । जो जगाते चाळिता [5] ।।283।। 5 जगाला चालवीणारा
मियाचि नियमिला सांता , । काळु ग्रासितसे भूता ।
इये म्हणियागते [6] पंडुसुता ! । सकळे जयाची , ।।284।। 6 चाकर
जो ऐसा समर्थू , । तो मी , जगाचा नाथु ।
आणि गगनाऐसा साक्षिभूतु । तोही मीचि ।।285।।

इही नामरुपी आघवा , । जो भरला असे पांडवा ! ।
आणि नामरुपाचाही वोल्हावा [1] । आपणचि जो ।।286।। 1 आधार
जैसे , जळाचे कल्लोळ । आणि कल्लोळी आथी जळ ।
ऐसेनि वसवीतसे सकळ । तो निवासु मी ।।287।।
जो मज होय अनन्य शरण । त्याचे निवारी मी जन्ममरण ।
यालागी शरणागता शरण्य । मीचि एकु ।।288।।
मीचि एक , अनेकपणे , । वेगळालेनि प्रकृतीगुणे , ।
जीत [2] जगाचेनि प्राणे । वर्तत असें ।।289।। 2 जीवंत
जैसा,समुद्र,थिल्लर,न म्हणता,।भलतेथ,बिंबे सविता,।
तैसा , ब्रह्मादि सर्वा भूता । सुह्रद तो मी ।।290।।
मीचि गा पांडवा ! ।या त्रिभुवनासि वोलावा ।
सृष्टिक्षयप्रभवा । मूळ , ते मी ।।291।।
बीज शाखाते प्रसवे , । मग ते रूखपण बीजी सामावे , ।
तैसे , संकल्पे [3] होय आघवे , । पाठी संकल्पी मिळे ।292।। 3 मानसीक कर्म प्रवृत्ती
ऐसे जगाचे बीज , जो संकल्पु , । अव्यक्त वासनारुपु , ।
तया कल्पांती जेथ निक्षेपु [4] । होय , ते स्थान मी ।।293।। 4 जेंथे लय पावतात
इये नामरुपे लोटती , । वर्णव्यक्ती आटती , ।
जातीचे भेद फिटती । जै आकारु नाही ।।294।।
तै संकल्पवासनासंस्कार । माघौते रचावया चराचर ।
जेथ राहोनि असती अमर , । ते निधान मी ।।+295।।

**तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।**
**अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ।।19।।**
**मी ऊन पाडितो,पाऊस आंखडितो आणि सोडितो:अमृत व मृत्यु,सत् आणि असत,हि हे अर्जुना! मी आहे.**

मी सूर्याचेनि वेषे ।तपे, तै हे शोषे ।
पाठी इंद्र होऊनि वर्षे ,। तै पुढति भरे ।।296।।
अग्नि काष्टे खाये ।ते काष्टचि अग्नि होये ।
तैसे मरते, मारिते पाहे । स्वरुप माझें ।।297।।
यालागी मृत्युच्या भागी जे,जे । तेही पै , रूप माझे ।
आणि न मरते , तंव सहजें। मीचि आहे ।।298।।
आता बहु बोलोनि सांगावे । ते एकिहेळा [5] घे पां ! आघवे । 5 एक वेळा
तरी सतासतही [6] जाणावे । मीचि पै गा ! ।।299।। 6 अविनाशी व विनाशी

म्हणौनि , अर्जुना ! मी नसे , । ऐसा कवणु ठाव असे ? ।
परि , प्राणियांचे दैव कैसे । जे न देखती माते ! ।।300।।
तरंग , पाणियेवीण सुकती । रश्मि, वातीवीण न देखती ।
तैसे मीचि , ते , मी नव्हती । विस्मो देखे ! ।।301।।
हे आतबाहेर मिया कोंदले । जग निखिल माझेचि वोतिले ।
की , कैसे कर्म तया आड आलें ! । जे , मीचि नाही म्हणती ।।302।।
परि अमृतकुहा पडिजे , । कां आपणयाते कडिये काडिजे ?।
ऐसे आथी , काय कीजें। अप्राप्तासी ? ।। 303।।
ग्रासा एका अन्नासाठी । अंधु धावताहे , किरीटी ! ।
आढळला चिंतामणी , पाये लोटी । आंधळेपणे ।। 304।।
**तैसे ज्ञान जै सांडुनि जाये , । तै ऐसी हे दशा आहे ।**
**म्हणौनि , कीजे ते केले नोहे । ज्ञानेवीण ।।305।।**
आधंळेया गरुडाचे पांख आहाती , । ते कवणा उपेगा जाती ? ।
तैसे , सत्कर्माचे उपखे ठाती [1] । ज्ञानेवीण ।।306।। 1 श्रम व्यर्थ जातात

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट् वा स्वर्गति प्रार्थयन्ते ।**
**ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकमश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ।।20।।**

**त्रैविद्य म्हणजे ऋक्,यजु व साम या तीन वेदांतील कर्मे करणारे जे सोमपी म्हणजे सोमयागी व निष्पाप पुरुष माझे यज्ञाने पूजन करून स्वर्गलोक प्राप्तीची इच्छा करितात,ते ते इंद्राच्या पुण्यलोकास पोचून स्वर्गात देवांचे अनेक दिव्य भोग उपभोगतात**

देख पां गा ! किरीटी ! । आश्रमधर्माचिया राहाटी ।
विधिमार्गा कसवटी [2] । जे आपणचि होती ।। 307।। 2 कसोटीकरिता
यजन करिता , कौतुके । तिही वेदांचा [3] माथा तुके[4] । 3 तीन्ही वेदांचा 4 मान डोलावतात
क्रिया , फळेसि उभी ठाके । पुढा जयां , ।।308।।
ऐसे दीक्षित जे सोमप [5] ।जे , आपणचि यज्ञाचे स्वरूप । 5 सोमरस पीणारे
तीही , तया पुण्याचेनि नांवे , पाप । जोडिले देखे ! ।।309।।
श्रुतित्रयाते जाणोनि , । शतवरी यज्ञ करूनी , ।
यजिलिया माते चुकोनी , । स्वर्गा वरिती ।।310।।
जैसे , कल्पतरुतळवटी । बैसोनि , झोळिये देतसे गाठी ।
मग निदैव निघे , किरीटी ! । दैन्यचि करू ।।311।।
तैसे , शतक्रतु[6] यजिले माते । की ईप्सितातित स्वर्गसुखाते । 6 शंभर यज्ञ
आतां , पुण्य , की , हे निरुते । पाप नोहे ! ।।312।।

म्हणौनि , मजवीण पाविजे स्वर्गु , । तो अज्ञानाचा पुण्यमार्गु ।
ज्ञानिये तयाते उपसर्गु [1] ।हानि म्हणती ।।313।। 1 विघ्न
एऱ्हवी , तरी नरकीचे दुःख । पावोनि , स्वर्गा नाम की सुख ।
वाचूनि , नित्यानंद गा निर्दोख । ते स्वरूप माझे ।।314।।
मज येता पै सुभटा । या द्विविधा गा ! आव्हाटा ।
स्वर्गु , नरकु , या वाटा । चोरांचिया ।।315।।
स्वर्गा , पुण्यात्मके पापे[2] , येईजे ; । पापात्मके पापे , नरका जाइजे ;। 2 पापयुक्त पुण्याने
मग , माते जेणे पाविजे , । ते शुध्द पुण्य ।।316।।
आणि मजचिमाजी असता , । जेणे मी दुऱ्हावे [3]पंडुसुता ! । 3 दुरावतो
ते पुण्य ऐसे म्हणता , । जीभ न तुटे काई ? ।।317।।
परि हे असो ; आता प्रस्तुत।। ऐके , यापरि ते दीक्षित।।
यजूनि माते , याचित।स्वर्गभोगु ।।318।।
मग , मी न पविजे ऐसें , । जे पापरूप पुण्य असे ।
तेणे लाधलेनि सौरसे [4] । स्वर्गा येती ।।319।। 4 सामर्थ्याने
जेथ अमरत्व हे सिंहासन । ऐरावतासारिखे वाहन ।
राजधानीभुवन । अमरावती।।320।।
जेथ महासिद्धीची भांडारे । अमृताची कोठारे ।
जिये गावी खिल्लारे [5] ।कामधेनूंची ।।321।। 5 कळप
जेथ वोळगे [6] ,देव पाइका [7] ,। सैंध [8] ,चिंतामणीचिया भूमिका [9] । 6 सेवेकरता 7 चाकर
विनोदवनवाटिका ।सुरतरूचिया ।।322।। 8 जीकडे तिकडे 9 जमीन
गंधर्व गात गाणी । जेथ रंभे ऐसिया नाचणी ।
उर्वशी मुख्य विलासिनी । अंतौरिया [10] ।।323।। 10 बायका प्राप्त होतात
मदन वोळगे शेजारे । जेथ चंद्र शिंपे सांबरे [11] । 11 सडा समार्जन
पवना ऐसे म्हणियारे [12] । धांवणे जेथ ।।324।। 12 म्हंटलेले करणारा
पै,बृहस्पती मुख्य आपण । ऐसे स्वस्तिश्रियेचे [13] ब्राह्मण । 13 आर्शिवाद व कल्याण इच्छिणारे
ताटियेचे [14] , सुरगण । बहुवस जेथे ।।325।। 14 पंक्तीला जेवणारे
लोकपाळ रांगेचे [15] , ।राउत [16] , जिये पदवीचे । 15 बरोबरीचे 16 घोडेस्वार
उच्चैःत्रवा , खाचे [17] , । खोळणिये [18] ।।326।। 17 कमी पडतात 18 वाहन म्हणून
हे असो ; बहु ऐसें । भोग इंद्रसुखासरिसे ।
ते भोगिजती जव असें । पुण्यलेशु ।।327।।

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ।**
**एवं त्रयी धर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते ।।21।।**

**आणि त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेऊन पुण्याच क्षय झाल्यावर ते पुनः जन्म घेऊन मृत्युलोकी येतात.अशा प्रकारे त्रयीधर्म म्हणजे तीन वेदातील यज्ञयागादि श्रौत धर्म पाळणाऱ्या व काम्य उपभोगाची इच्छा ठेवणाऱ्या लोकास येरझाऱ्या प्राप्त होतात.**

मग तया पुण्याची पाउटी [1] सरे । सवेचि इंद्रपणाची उटी उतरे । 1 दर्जा
आणि येऊ लागती माघारे । मृत्युलोका ।।328।।
जैसा , वेश्याभोगी कवडा वेचे , । मग दारही चेपू नये तियेचे ।
तैसे , लाजिरवाणे दीक्षितांचे । काय सांगो ? ।।329।।
एवं थितिया [2] माते चुकले । जीही , पुण्ये स्वर्ग कामिले । 2 जवळ असलेल्या
तया अमरपण ते वावो जाले । अंती मृत्युलोकु ।।330।।
मातेचिया उदरकुहरी [3] । पचूनि विष्टेच्या दाथरी [4] । 3 पोटाच्या गुहेत 4 थरात
उकडूनि नवमासवरी , । जन्मजन्मोनि मरती ।।331।।
अगा ! स्वप्नी निधान फावे , । परि चेइलिया हारपे आघवे ।
तैसे , स्वर्गसुख जाणावे ।वेदज्ञाचे ।।332।।
अर्जुना ! वेदविद जऱ्ही जाहला , । तरी , माते नेणता वाया गेला ।
कणु सांडूनि उपणिला [5] । कोंडा जेसा ।।333।। 5 वाऱ्यावर धरणे
म्हणौनि मज एकेविण , । हे त्रयीधर्म अकारण [6] । 6 व्यर्थ
आता माते जाणोनि , काही नेण [7] । तु सुखिया होसी ।।334।। 7 इतर कांही जाणले नाही तरी

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यम् ।।22।।**

**जे अनन्यनिष्ठ लोक माझे चिंतन करून मला भजतात त्या नित्य योगयुक्त पुरुषांचा योगक्षेम मी चालवीत असतो.**

पै , सर्वभावेसी उखिते [8] । जे वोपिले [9] मज चित्ते । 8 जसेच्या तसे 9 विकले
जैसा गर्भगोळु [10] ,उद्यमाते ।कोणाही नेणे ।। 335।। 10 गर्भातील मूल
तैसा , मीवाचूनि कांही । आणिक गोमटेचि नाही ।
मजचि नाम पाही ! । जिणेया ठेविले ।। 336।।
ऐसे अनन्यगतिके चित्ते । चिंतितसांते [11] माते । 11 चिंतन करित असतात
जे उपसिती , तयांते । मीचि सेवी ।।337 ।।
ते , एकवटूनि जिये क्षणी , ।अनुसरले , गा ! माझिये वाहणी [12] । 12 मार्ग
तेव्हाचि , तयाचि चिंतवणी [13] । मजचि पडली ।।338। । 13 काळजी
मग तीही जे ,जे , करावे , । ते मजचि पडिले आघवे ।
जेसी , अजात पक्षाचेनि [14] जीवे । पक्षिणी जिये ।।339।। 14 पंख न फुटलेला पक्षी

आपुली तहान भूक नेणे । तान्हया , निके [1],ते माउलीसीचि करणे ।     1 चांगले
तैसे अनुसरले जे मज प्राणे , । तयांचे सर्व मी करी ।।340।।
तया , माझिया सायुज्याची चाड । तरि , तेचि पुरवी कोड ।
कां, सेवा म्हणती , तरी आड । प्रेम सूये ।।341।।
ऐसा मनी जो, जो धरिती भावो । तो, तो पुढां, पुढां लागे तयां देवो ।
आणि दिधलियाचा निर्वाहो[2] । तोही मीचि करी ।।342।।     2 सांभाळ
हा योगक्षेमु आघवा । तयांचा , मजचि पडिला पांडवा ! ।
जयांचिया सर्वभावा । आश्रयो मी ।।343।।

**येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ।।23।।**
**श्रद्धेने युक्त होत्साते दुसऱ्या देवतांचे भक्त बनून जे यजन करितात तेहि हे कौंतेया! विधिपूर्वक नसले तरी पर्यायाने माझेच यजन करितात.**

आता आणिकही संप्रदाये , ।परी माते नेणती समवाये [3] ।     3 सर्वत्र समान असणारा
जे अग्नीइंद्रसूर्यसोमाये । म्हणौनि यजिती ।।344।।
तेही कीर माते‍चि होये । कां , जे हे आघवे , मीचि आहे ।
परि ते भजती उजरी [4] नव्हे , । विषम [5] पडे ।।345।।     4 सरळ  5 वाकडे
पाहे पां,शाखा,पल्लव,रुखाचे । हे काय नव्हती एकाचि बीजाचे ? ।
परी , पाणी घेणे मुळाचे । ते मुळीचि घापे [6] ।।346।।     6 घालणे
कां ,दहाही इंद्रिये आहाती । इये जरी एकेचि देहीची होती ।
आणि इही सेविले विषयो , जाती । एकाचि ठायी ।। 347।।
तरि , करोनि रससोय बरवी , ।कानी केवी भरावी ! ।
फुले आणोनि बांधावी । डोळा केवी ! ।।348।।
तेथ , रसु तो मुखेचि सेवावा । परिमळु तो घ्राणेचि घ्यावा ।
तैसा , मी तो यजावा , । मीचि म्हणौनि ।।349।।
**येर माते नेणोनि भजन । ते वायाचि , गा ! आनेआन [7] ।**     7 भलतीकडेच
**म्हणौनि , कर्माचे डोळे , ज्ञान , । ते निर्दोष होआवे ।।350।।**

**अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।**
**न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ।।24।।**
**कारण सर्व यज्ञांचा भोक्ता व स्वामी मीच आहे. पण त्यांना माझे तत्त्वतः ज्ञान नाही म्हणून ते घसरत असतात.**

एऱ्हवी पाहे पां पंडुसुता ! । या यज्ञोपहारा समस्तां ।
मीवाचूनि भोक्ता । कवणु आहे ? ।।351।।
मी सकळां यज्ञांचा आदि ।आणि यजना , या मीचि अवधि [1] । 1 शेवट
कीं , माते चुकोनि दुर्बुद्धि । देवा भजले ।।352।।
गंगेचे उदक , गंगे जैसे । अर्पिजे देवपितरोद्देशे , ।
माझें , मज देती तैसें , । परि आनानी भावी ।।353।।
म्हणौनि ते पार्था ! । माते न पवतीचि सर्वथा ।
मग , मनी वाहिली जे आस्था , ।तेथ आलें।।354।।

**यांति देवव्रता देवान् पितृन्यान्ति पितृव्रताः ।**
**भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ।।25।।**
**देवांचे व्रत करणारे देवांस,पितरांचे पितरांस निरनिराळ्या भूतांची पूजा करणारे त्या त्या भूतास , आणि माझे यजन करणारे मला येऊन पोचतात**

मने , वाचा , करणी , । जयांची भजने देवांचिया वाहणी [2] । 2 मार्गाने
ते शरीर जातिये क्षणी । देवचि जाले ।।355।।
अथवा , पितरांची व्रते । वाहती जयांची चित्ते , ।
जीवित सरलिया तयांते । पितृत्व वरी ।।356।।
कां , क्षुद्रदेवतादि भूते । तियेचि जयांचि परमदैवते , ।
जिही अभिचारिकीं [3] तयांते । उपासिले ।।357।। 3 जारण मारण कर्मा-
तयां देहाची जवनिका [4] फिटली । आणि भूतत्वाची प्राप्ती जाहली । संबंधी क्रियेने 4 पडदा
एवं , संकल्पवशे फळली । कर्मे तयां ।।358।।
मग मीचि डोळा देखिला ।जिही कानी मीचि ऐकिला ।
मीचि मनी भाविला । वानिला वाचा ।।359।।
सर्वांगी सर्वाठायी । मीचि नमस्कारिला जिही ।
दानपुण्यादिके जे कांही । ते माझियाचि मोहरा ।।360।।
जिही मातेचि अध्ययन केले । जें , आतबाहेरि मियांचि धाले ।
जयांचे जीवित्व जोडले । मजचि लागी ।।361।।
जे अहंकारु वाहत आंगी , । ' आम्ही हरीचे ' भूषावयालागी ।
जे लोभिये एकचि जगी । माझेनि लोभे ।।362।।
जे माझेनि कामे सकाम । जे माझेनि प्रेमे सप्रेम ।
जे माझिया भुली सभ्रम । नेणती ,लोक [5] ।। 363।। 5 लौकिक भाव
जयांची जाणती मजचि शास्त्रे । मी जोडे जयांचेनि मंत्रे ।
ऐसे जे चेष्टामात्रे [6] । भजले मज ।।364।। 6 सर्व व्यवहारात

ते मरणा ऐलीचकडे । मज मिळोनि गेले फुडे ।
मग मरणी आणिकीकडे । जातील केवी ? ।।365।।
म्हणौनि मद्याजी जे जाहाले।ते माझियाचि सायुज्या [1] आले । 1 4 था मोक्ष
जिही उपचारमिषे दिधले । आपणपे मज ।।366।।
पै ,अर्जुना ! माझे ठायी ।आपणपेवीण [2] सौरसु [3] नाही। 2 आत्मस्वरूप अनुभवा-
मी उपचारे कवणाही ।नाकळे , गा ! ।।367।। वाचून 3 आवड
एथ जाणीव करी , तोचि नेणे । आथिलेपण [4] मिरवी ,तेचि उणे । 4 सपन्नता
' आम्ही जाहलो ' ऐसे जो म्हणे ,। तो ,काहीचि नव्हे ।।368।।
अथवा, यज्ञदानादि , किरीटी ! । कां ,तपे , हन , जे हुटहुटी [5] । 5 गर्व
ते तृणा एकासाठी । न सरे, एथ ।। 369।।
पाहे पां ! जाणिवेचेनि बळे , । कोण्ही वेदापासूनि असे आगळे ? ।
कीं , शेषाहूनि तोंडाळे , । बोलके आथी ? ।।370।।
तोही आंथरुणातळवटी दडे । येरु,नेति,नेति,म्हणौनि बहुडे [6] । 6 मागे फिरतात
एथ , सनकादिक वेडे । पिसे जाहले ।।371।।
करिता तापसांची कडसणी [7] । कवणु जवळा ठेविजे [8] शूळपाणी ? । 7 निवड 8 योग्यतेला पोचतो
तोही अभिमानु सांडूनि , पायवणी [9] ।माथा वाहे ।।372।। 9 चरणतीर्थ
नातरी , आथिलेपणे सरिशी , । कवणी आहे लक्ष्मीये ऐसी ? ।
श्रियेसारिखिया दासी । घरी जियेते ।। 373।।
तिया , खेळता करिती घरकुली , । तयां नामे अमरपुरे जरि ठेविली ।
तरि न होती काय बाहुली । इंद्रादिक तयांची ?।।374।।
तिया ,नावडोनि जेव्हा मोडिती , । तेव्हा महेद्राचे रंक होती ।
तिया झाडा जेउते पाहती , । ते कल्पवृक्ष ।।375।।
ऐसिया जियेचिया जवळिका , । सामर्थ्य , घरीचिया पाइका ।
ते लक्ष्मी , मुख्यनायका ,। न मनेचि एथ ।।376।।
मग ,सर्वस्वे करूनि सेवा , । अभिमानु सांडूनि पांडवा ! ।
ते पाय धुवावयाचिया दैवा । पात्र जाहाली ।।377।।
म्हणौनि,थोरपण पऱ्हा [10] सांडिजे । एथ व्युत्पत्ती [11] आघवी विसरिजे । 10 दूर 11 शास्त्रिय
जै , जगा धाकुटे होईजें , । तै , जवळीक माझी ।।378।। ज्ञानाचा गर्व
अगा , सहस्त्रकिरणांचिये दिठी । पुढा , चंद्रही लोपे किरीटी ! ।
तेथ खद्योत कां हुटहुटी [12] । आपुलेनि तेजे ?।।379।। 12 गर्व
तैसे लक्ष्मियेचे थोरपण न सरे , । जेथ शंभूचेही तप न पुरे ।
तेथ येर प्राकृत हेंदरे [13] । केवी जाणो लाहे ? ।।380।। 13 अजागळ
यालागी शरीर सांडोवा [14] कीजे । सकळ गुणांचे लोण उतरिजें [15] । 14 झीजवणे 7ओवाळून
संपत्तिमदु सांडिजे । कुरवंडी करूनि ।।381 ।। टाकणे

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।।26।।**

**एखादे पान,फूल,फळ किंवा यथाशक्ति थोडे पाणीहि जो मला भक्तीने अर्पण करितो, त्या प्रयतात्म म्हणजे नियतचित्त पुरुषाची ती भक्तीची भेट मी आनंदाने सेवन करितो.**

मग निस्सिमभाव उल्हासे [1] । मज अर्पावयाचेनि मिसे । — 1 प्रसन्नतेने
फळ एक आवडे तैसें । भलतयाचे हो । ।383 । ।
भक्तु माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोडवी ।
मग देठु न फेडिता सेवी । आदरेशी [2] ।।383।। — 2 आरंभ करणे
पै , गा भक्तीचेनि नांवे , । फूल एक मज द्यावे ।
ते लेखे [3] तरि म्या तुरंबावे [4] , । परि मुखीचि घाली ।।384।। — 3 विचार कारता 4 वास घ्यावा
हे असो ; कायसी फुले ! । पानचि एक आवडे ते [5] जाहले , । — 5 हवे तसे
ते साजुकही [6] न हो सुकले । भलतैसें ।।385।। — 6 ताजे
परि सर्वभावे भरले देखे , ।आणि भुकेला अमृते तोखे [7] । — 7 संतोषणे
तैसे पत्रचि , परि तेणे , सुखे। आरोगु [8] लागे ।।386।। — 8 खाणे
अथवा ऐसेही एक घडे , । जे पालाही परी न जोडे , ।
तरि उदकाचे तंव सांकडे । नव्हेल कीं ? ।।387।।
ते भलतेथ निमोले [9] । न जोडिता [9अ] , आहे जोडले [10] । — 9 फुकट 9(अ) सहज
तेचि , सर्वस्व करूनि अर्पिले । जेणे मज , ।।388।। — 10 मिळवणे
तेणे वैकुंठापासोनि विशाळे , । मजलागी केली राऊळे ।
कौस्तुभाहोनि निर्मळे । लेणी दिधली ।।389।।
दुधाची सेजारे [11] । क्षीराब्धी ऐसी मनोहरे । — 11 बिछाना
मजलागी अपारे । सृजिली तेणें ।।390।।
कर्पूर चंदन अगरु [12] ।एसेया सुगंधाचा महमेरु । — 12 चंदन विशेष
मज हातिवा लाविला दिनकरु [13] । दीपमाळे ।।391 ।। — 13 प्रतीसूर्य अशी काडवात लावली
गरुडासरिखी वाहने । मज सुरतरुंची उद्याने ।
कामधेनूची गोधने । अर्पिली तेणे ।।392।।
मज अमृताहूनि सुरसे । बोनी [14] वोगरिली बहुवसे । — 14 पक्वान्ने
ऐसा भक्ताचेनि उदकलेशे । परितोषे गा ।। 393।।
हे सांगावे काय किरीटी ! । तुवाचि देखिले आपुलिया दिठी ।
मी सुदामाचिया सोडी गाठी । पव्हयालागी ।।394।।
पै भक्ती एकी मी जाणे । तेथ साने थोर न म्हणे ।
आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ।।395।।

येर , पत्र पुष्प फळ , । हे भजावया मिस केवळ ।
वाचूनि , आमुचा लाग [1] निष्कळ [2] । भक्तितत्त्व ।।396।। 1 आवड 2 शुध्द
म्हणौनि अर्जुना! अवधारी । तूं बुद्धी एकी सोपारी [3] करी । 3 स्वाधीन
तरि सहजे आपुलिया मनोमंदिरी । न विसंबे माते ।।397।।

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।27।।**
**हे कौंतेया!तू जे करितोस,जे खातोस,जे हवन करितोस,जे दान करितोस,जे तप करितोस;ते सर्व मला अर्पण करीत जा**

जे जे काही व्यापार करिसी । कां , भोग हन भोगिसी ।
अथवा यज्ञी यजिसी । नानाविधी ।। 398।।
नातरी , पात्रविशेषे दाने । कां , सेवकां देसी जीवने ।
तपादि , हन , साधने । व्रते करिसी ।।399।।
ते क्रियाजात आघवे , । जे जैसे निपजेल स्वभावे ।
ते भावना करोनि करावे । माझिया मोहरा ।।400।।
परि , सर्वथा आपुले जीवी । केलियाची से काहीचि नुरवी ।
ऐसी धुवोनि कर्मे द्यावी । माझिया हाती ।।401।।

**शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः ।**
**संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ।।28।।**
**अशाप्रकारे वागल्याने कर्मे करुनहि कर्माची शुभाशुभफलरुप जी बंधने त्यापासून तुझी सुटका होईल, व कर्मफलाचा संन्यास करण्याचा जो हा योग त्याने युक्तात्मा म्हणजे शुद्धान्तःकरण आणि मुक्त होत्साता मला येऊन पोचशील.**

मग अग्निीकुंडी बीजे घातली । तिये अंकुरदशे , जेवी मुकली ।
तेवी , न फळतीचि , मज अर्पिली । शुभाशुभे ।।402।।
अगा ! कर्मे जै उरावे । तै , तिही सुखदुःखी फळावे ।
आणि तयाते भोगावया यावे । देहा एका ।।403।।
ते उगाणिले [4] मज कर्म , । तेव्हाचि पुसिले मरण जन्म । 4 अर्पण करणे
जन्मासवे श्रम ।वरचिलही [5] , गेलें ।।404।। 5 सोबत येणारे
म्हणौनि , अर्जुना ! यापरी ।पाहेचा [6] वेळु नव्हेल भारी [7] । 6 ज्ञानाची पहाट 7 दूर
हे संन्यासयुक्ति सोपारी । दिधली तुज ।।405।। 8 बंधन
या देहाचिया बांदोडी [8] न पडिजे । सुखदुःखाचिया सागरी न बुडिजें ।
सुखे सुखरुपा घडिजें। माझियाचि आंगा ।।406।।

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।**
**ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।।29।।**
**मी सर्व भूताना सारखा आहे. मला द्वेष्य म्हणजे नावडता, आणि प्रिय म्हणजे आवडता नाही. तर जे माझे भक्तीने भजन करितात ते माझ्या ठायी, आणि मीहि त्यांच्या ठायी असतो.**

तो मी पुससी कैसा ? । तरि , जो सर्वभुती सदा सरिसा ।
जेथ , आपपरु ऐसा , । भागु नाही ।। 407।।
जे ऐसिया माते जाणोनि । अहंकाराचा कुरुठा [1] मोडोनि । 1 घर
जे जीवे कर्मे करुनि। माते भजले ।।408।।
ते वर्तत दिसती देही , । परि , ते देही ना [2] , माझ्या ठायी । 2 देहात नसतात
आणि मी तयांच्या हृदयी । समग्र असे ।।409।।
सविस्तर वटत्व जैसे । बीजकणिकेमाजी असें ।
आणि बीजकणु वसे । वटी जेवीं ।।410।।
तेवी , आम्हा तया परस्परे । बाहेर नामाचीचि अंतरे ।
वाचूनि , आंतुवट वस्तुविचारे । मी ,तेचि ते ।।411।।
आता जायांचे [3] जैसे लेणे । आंगावरी आहाचवाणे [4] । 3 उसने आणलेले 4 वरवरचे
तैसे देहधरणे । उदास तयांचे ।।412।।
परिमळु निघालिया पवनापाठी । मागे वोस फूल राहे देठी ।
तैसे , आयुष्याचिये मुठी । केवळ देह ।।413।।
येर अवष्टंभु [4] जो आघवा ।तो आरूढोनि मद् भावा । 4 अहंकार
मजचि आंतु पांडवा ! । पैठा [5] जाहला ।।414।। 5 स्थीर

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधूरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।।30।।**
**मोठा दुराचारी का असेना; मला जर तो अनन्यभावाने भजत आहे, तर तो साधुच समजला पाहिजे कारण त्याच्या बुद्धीचा निश्चय चांगला झालेला असतो**

ऐसे भजतेनि प्रेमभावे । जया शरीरही पाठी न पवे ।
तेणे भलतया व्हावे । जातीचिया ।।415 ।।
आणि आचरण पाहता सुभटा ! ।तो दुष्कृताचा कीर सेल [6] वांटा । 6 शेलका
परि , जीवित वेचिले चोहटा । भक्तीचिया , कीं ! ।।416।।
अगा ! अंतीचिया मती ।साचपण , पुढिले गती ।
म्हणौनि , जीवित जेणे भक्ती । दिधले शेखी ।।417।।

तो आधी जरी दुराचारी ।तरी सर्वोत्तमुचि अवधारी ।
जैसा , बुडाला महापुरी । न मरतु निघाला ।।418।।
तयाचे जीवित ऐलथडिये आले ।म्हणौनि बुडालेपण जेवी वाया गेलें ।
तेवी , नुरेचि पाप केले ,। शेवटलिये भक्ती ।।419।।
यालागी , दुष्कृती जऱ्ही जाहाला , । तरी , अनुतापतीर्थी न्हाला ।
न्हाऊनि मजआंतु आला ।सर्वभावे ।।420।।
तरी आतां , पवित्र तयाचेचि कुळ । आभिजात्य [1] तेचि , निर्मळ । — 1 श्रेष्ठ कुलीनत्व
जन्मलेयाचे फळ , । तयासीच जोडले ।।421।।
तो सकळही पढिन्नला । तपे तोचि तपिन्नला ।
अष्टांग अभ्यासिला । योगु तेणें ।।422।।
हे असो बहुत ; पार्था ! । तो उतरला [2]कर्मे सर्वथा , । — 2 कर्मफळापासून मुक्त
जयाची , अखंड गा आस्था । मजचिलागी ।।423।।
अवघिया मनोबुद्धीचिया राहटी । भरोनि एकनिष्ठेची पेटी ।
मजमाजी किरीटी ! । निक्षेपिली [3] जेणे ।।424।। — 3 अर्पण केली

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्ति निगच्छति ।**
**कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ।।31।।**

**तो लवकर धर्मात्मा होतो व नित्य शांति पावतो.हे कौंतेया ! तू असे पक्के समज की, माझा भक्त कधीहि नाश पावत नाही**

तो , आता अवसरे , मजसारिखा होईल । ऐसा , हन भाव , तुज जाईल ।
हां गा ! अमृताआंत राहील । तया मरण कैचे ? ।।425।।
पै , सूर्यु जो वेळु नुदैजे , । तया वेळा की रात्रि म्हणिजे ।
तेवी , माझिये भक्तीविण जे कीजे , । ते , महापाप नोहे ?।।426।।
म्हणौनि ,तयाचिया चित्ता । माझी जवळिक पंडुसुता ! ।
तेव्हांचि तो तत्त्वता । स्वरूप माझें ।।427।।
जैसा दीपे दीपु लाविजे , । तेथ आदील [3] कोण ? हे नोळखिजें । — 3 पहीला
तैसा , सर्वस्वे जो मज भजे , । तो , मीचि होऊनि ठाके ।। 428।।
मग माझी नित्य शांती ,। तया , दशा , तेचि कांती ।
किंबहुना , जिती ।माझेनि जीवे ।। 429।।
एथ पार्था ! पुढतपुढती , ।तेचि ते सांगो किती ! ।
जरी मिया चाड [4] , तरी भक्ती। न विसंबिजे गा ! ।।430।। — 4 माझी आवड असेल तर
अगा ! कुळाचिया चोखटपणा नलगा । आभिजात्य [5] झणी श्लाघा [6] । — 5 कुलीनपणा 6 नका वाखाणु
व्युत्पत्तीचा वाउगा [7] । सोसु कां वहावा ? ।।431।। — 7 विद्वत्तेचा खोटा तोरा

कां ,रुपवयसा माजा ? ।आथिलेपणे कां गाजा ? ।
एक भाव नाही माझा । तरी , पाल्हाळ ते ।।432।।
कणेविण सोपटे [1] । कणसे लागली घनदाटे ! । 1 दाणा नसलेले कणीस
काय करावे गोमटे ! । वोस नगर ।।433।।
नातरी सरोवर आटले । रानी दुःखिया दुःखी भेटले ।
कां वांझ फुली , फुलले । झाड जैसे ।।434।।
तैसे , सकळ ते वैभव । अथवा , कुळ जाति गौरव ।
जैसे , शरीर आहे सावेव , ।परि जीवचि नाही ।।435।।
तैसें , माझिये भक्तीविण ।जळो ते जियालेपण ।
अगा , पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ? ।।436।।
पै , हिवराची [2] दाट साउली । सज्जनी जैसी वाळिली। 2 फड्या निवडुंग
तैसी पुण्ये , डावलूनि गेली । अभक्ताते ।।437।।
निंब,निबोळिया मोडोनि [3]आला। तरी,तो काउळियांसीचि सुकाळु जाहला । 3 बहरुन
तेसा , भक्तिहीनु वाढिन्नला । दोषांचिलागी ।।438।।
कां , षड्रस खापरी वाढिले , । वाढूनि , चोहटा ठेविले ।
ते सुणियाचेचि [4] ऐसे झाले । जियापरी ।।439।। 4 कुत्र्याचेच
तैसे भक्तिहीनाचे जिणे । जो स्वप्नीहि परि , सुकृत नेणे ।
तेणे संसारदुःखासि भाणे [5] । वोगरिले[6] ।।440।। 5 ताट 6 वाढले
म्हणौनि ,कुळ उत्तम नोहावे , । जाती अंत्यजही व्हावे ।
वरि देहाचेनि नांवे । पशूचेही लाभो ।।441।।
पाहे पां ! सावजे हातिरु [7] धरिले,। तेणे ,तया काकुळती,माते स्मरिले । 7 हत्ती
की , तयाचे पशुत्व वावो जाहले , । पावलिया माते ।।442।।

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।।32।।**

**कारण हे पार्था ! माझा आश्रय करून,स्त्रिया,वैश्य व शूद्र किंवा अंत्यजादि जे पापयोनि असतील ते देखील परम गती पावतात.**

अगा ! नांवे घेता वोखटी [8] ! । जे आघवेया अधमांचिये शेवटी । 8 दोष
तिये पापयोनीही किरीटी । जन्मले जें ।।443।।
ते पापयोनि मूढ । मूर्ख , जैसे का दगड ।
परि माझ्या ठायी दृढ । सर्वभावे ।।444।।
जयाचिये वाचे , माझे आलाप [9] ,। दृष्टी भोगी , माझेचि रूप । 9 कथा
जयांचे मन , संकल्प । माझाचि वाहे ।।445।।

माझिया कीर्तिविण । जयाचे रिते नाही श्रवण ।
जया सर्वांगी भूषण । माझी सेवा ।।446।।
जयांचे ज्ञान विषो नेणे । जाणीव , मज एकातेचि जाणे ।
जया ऐसे लाभे , तरी जिणे, । एऱ्हवी मरण ।।447।।
ऐसा आघवाचि परी पांडवा ! । जिही आपुलिया सर्वभावा ।
जियावयालागी वोलावा[1] । मीचि केला ।।448।। 1 आधार
ते पापयोनीही होतु का ! । ते श्रुताधीतही [2] न होतु का ! । 2 शास्त्र ऐकलेला
परि मजसी तुकिता [3] तुका [4] । तुटी नाही ।।449।। 3 तुलना करिता 4 तुलनेने
पाहे पां ! भक्तीचेनि आथिलेपणे । दैत्यी , देवा आणिले उणे ।
माझे नृसिंहत्व लेणे । जयाचिये महिमे ।।450।।
तो प्रल्हादु गा ! मजसाठी । घेता बहुते संकटे सदा , किरीटी ! ।
कां , जे मिया द्यावे , ते गोष्टी । तयाचिया जोडे ।।4 51।।
एऱ्हवी दैत्यकुळ साचोकारे , । परि इंद्रही सरी [5] न लाहे , उपरे [6]। 4 बरोबरी करु शकत
म्हणौनि , भक्ति गा एथ सरे ।जाति अप्रमाण ।।452।। नाही 6 जास्तच
**राजाज्ञेची अक्षरे , आहाती ,। तिये चामा [7] एका जया पडती । 7 कातडी**
**तया चामासाठी जोडती । सकळ वस्तु ।।453।।**
वांचूनि , सोने , रुपे , प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे ।
तेचि चाम एक जै लाहे , । तेणे विकती आघवी ।।454।।
तैसे , उत्तमत्व तैचि तरे । तैचि सर्वज्ञता सरे ।
जै मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमे ।।455।।
म्हणौनि , कुळ , जाति , वर्ण , । हे आघवेचि गा ! अकारण ।
एथ अर्जुना ! माझेपण । सार्थक एक ।।456।।
तेचि भलतेणे भावे । मन मज आतु येते होआवे ।
आले , तरी आघवे । मागील वावो [8] ।।457।। 8 व्यर्थ
जैसे , तवचि वहाळ वोहळ [9] , । जंव न पवती गंगाजळ । 9 नाले ओढे
मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ।।458।।
कां , खैर , चंदन काष्टे । हे विवंचना तंवचि घटे ।
जंव , न घापती [10] , एकवटे । अग्नीमाजी ।।459।। 10 घालणे
तैसे क्षत्री , वैश्य , स्त्रिया , । कां शूद्र , अंत्यजादि इया ।
जाति , तवंचि वेगळालिया । जव न पवती माते ।।460।।
मग जाती,व्यक्ती,पडे बिंदुले [11] । जेंव्हा,भावे, होती मज मीनले । 11 शून्य होतात
जैसे , लवणकण घातले । सागरामाजी ।।461।।
तंववरी , नदानदीची नांवे । तंवचि , पूर्वपश्चिमेचे यावे ।
जंव न येती आघवे । समुद्रामाजी ।।462।।

हेचि , कवणे एके मिसे । चित्त माझे ठायी प्रवेशे ।
येतुले हो , मग आपैसे । मीचि होणे असें ।।463।।
अगा ! वरी , फोडावयालागी । लोहो मिळो कां परिसाचे आंगी , ।
कां , जे मिळतिये प्रसंगी । सोनेचि होईल ।।464।।
पाहे पां ! वालभाचेनि [1] व्याजे । तिया व्रजांगनांची [2] निजे [3] । 1 प्रेमाने 2 गोपी
मज मीनलिया , काय माझे ।स्वरूप नव्हती ?।।465।। 3 अंतःकरणपूर्वक
नातरी , भयाचेनि मिसे ।माते न पविजेचि काय कंसे ? ।
की अखंड वैरवशे । चैद्यादिकी ? ।। 466।।
अगा सोयरेपणेचि पांडवा ! । माझे सायुज्य यादवा ।
की ममत्वे , वसुदेवा-। दिका सकळां ।।467।।
नारदा , ध्रुवा , अक्रुरा , । शुका , हन , सनत्कुमारा ।
इया , भक्ती मी धनुर्धरा ! । प्राप्यु जैसा , ।। 468।।
तैसाचि , गोपिकासि कामे , । तया कंसा , भयसंभ्रमे , ।
येरा घातकां , मनोधर्मे । शिशुपालादिका ।।469।।
अगा ! मी एकुलाणीचे खागे [4] । मज येवो पां ! भलतेनि मार्गे । 4 एकच अंतीम स्थान
भक्ती , कां विषयविरागे , । अथवा वैरे ।।470।।
म्हणौनि , पार्था ! पाही । प्रवेशावया माझ्या ठायी ।
उपायांची नाही । वाणी [5] एथ ।।471।। 5 कमतरता
आणि भलतिया जाती जन्मावे , । मग , भजिजे कां विरोधावे , ।
परि भक्त , कां वैरिया व्हावे , । माझियाचि ।।472।।
अगा ! कवणे एके बोले , । माझेपण जऱ्ही जाहाले , ।
तरी , मी होणे आले । हाता , निरुते ।।473।।
यालागी , पापयोनीही अर्जुना ! । कां ,वैश्य , शूद्र , अंगना , ।
माते भजता , सदना । मझिया येती ।।474।।

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।**
**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ।।33।।**

**मग जे पुण्यवान ब्राह्मण तसेच राजर्षि माझे भक्त आहेत त्यांची गोष्ट कशास पाहिजे ? या अनित्य व असुख म्हणजे दुःखकारक मृत्युलोकी तूं आहेस म्हणून मला भज**

मग वर्णामाजी छत्रचामर [6] ।स्वर्ग जयांचे अग्रहार [7] । 6 श्रेष्ठ 7 ब्राह्मणांना ईनाम
मंत्रविद्येसि माहेर ।ब्राह्मण जे ।।475 ।। दिलेली जमीन
जे पृथ्वीतळीचे देव । जे तपोवतार सावयव ।
सकळ तीर्थासी दैव । उदयले जे ।।476।।

जेथ अखंड वसिजे यागी । जे वेदांची वज्रांगी [1] । 1 चिलखत
जयांचेनि दिठीचिया उत्संगी [2] । मंगळ वाढे ।।477।। 2 मांडीवर
जयाचिये आस्थेचेनि वोले [3] ।सत्कर्म पाल्हाळी [4] गेलें । 3 ओलावा 4 डवरले
संकल्पे [5] सत्य जियाले । जियाचेनि ।।478।। 5 इच्छेने
जयाचेनि गा ! बोले । अग्नीसी आयुष्य जाहाले ।
म्हणौनि , समुद्रे पाणी आपुले । दिधले यांचिया प्रीती ।।479।
मिया,लक्ष्मी डावलोनि केली परौती ,। फेडोनि कौस्तुभ,घेतला ह्राती ।
मग वोडविली वक्षःस्थळाची वाखती [6] ।चरणरजा [7] ।।480।। 6 छातीचा खळग्यात
आझुनि पाउलाची मुद्रा , । मी ह्रदयी वाहे गा सुभद्रा ! । 7 पायधूळ
जे आपुलिया दैवसमुद्रा [8] । जतनेलागी [9] ।।481।। 8 षड् गुण ऐश्वर्य रुपी समुद्र
जयाचा कोप सुभटा ! । काळाग्नीरुद्राचा वसौटा [10] । 9 मिरवण्याकरिता 10 आश्रयस्थान
जयांचे प्रसादी , फुकटा । जोडती सिद्धी ।। 482।।
ऐसे पुण्यपूज्य जे ब्राह्मण । आणि माझ्या ठायी अतिनिपुण ।
आतां ,माते पावती , हे कवण । समर्थावे ?।।483।।
पाहे पां ! चंदनाचेनि अंगानिळे [11]। शिवतिले [12] निंब होते जे जवळे। 11 अंगावारून येणारा वारा
तिही निर्जिवीही [13] ,देवांची निडळे [14] । बैसणे केली ।।484।। 12 स्पर्श केला 13 निर्जीव
मग तो चंदनु तेथ न पवे , ।ऐसे मनी कैसेनि धरावे ?। वृक्षांनी 14 कपाळ
अथवा पातला , हे समर्थावे । तेव्हा , कायी साच ?।।485।।
जेथ निववील ऐशिया आशा , ।हरे, चंद्रमा आधा ऐसा ।
वाहिजत असे शिरसा ।निरंतर , ।।486।।
तेथ निववित आणि सगळा , । परिमळे चंद्राहूनि आगळा ।
तो चंदनु केवी अवलीळा [15] । सर्वांगी न बैसे ?।।487।। 15 सहजच
कां,रथ्योदके [16] जियेचिये कासे ।लागलिया,समुद्र जाली अनायासे।
तिये गंगेसी , काय अनारिसे । गत्यंतर असें ? ।।488।। 6 गटारातले पाणी
म्हणौनि , राजर्षि कां ब्राह्मण ।जया, गति, मति , मीचि शरण्य ।
तया , त्रिशुद्धी , मीच निर्वाण । स्थितीही मीचि ।।489।।
यालागी शतजर्जर [17] नावे ।रिगोनि , केवी निश्चित होआवे ? । 17 शेकडो ठीकाणी खीळखीळी
कैसेनि उघडिया असावे । शस्त्रवर्षी [18] ? ।।490।। झालेल्या 18 शस्त्रांचा वर्षाव
अंगावरी पडता पाषाण । न सुवावे [19] केवी वोडण [20] ? । 19 आड घालणे 20 ढाल
रोगे दाटला , आणि उदासपण । वोखदेसी ? ।।491।।
जेथ चहूकडे जळत वणवा ।तेथूनि न निगिजे केवी ? पांडवा ! ।
तेवी लोका येऊनि सोपद्रवा [21],। केवी न भजिजे माते ? ।।492।। 21 दुःखाने भरलेल्या
अगा ! माते न भजावयालागी , । कवण बळ पां ! आपुलिया आंगी ? ।
काई घरी , की , भोगी । निश्चिती केली ? ।। 493।।

नातरी , विद्या की वयसा , । ययां प्राणियांसि हा ऐसा ।
मज न भजता , भरवंसा । सुखाचा ,कोण ? ।।494।।
तरी भोग्यजात जेतुले । ते एका देहाचिया निकिया [1] लागले । 1 व्यर्थ
आणि एथ देह तंव असे पडिले , । काळाचिये तोंडी ।।495।।
बाप ! दुःखाचे केणे [2] सुटले । जेथ मरणाचे भरे [3] लोटले । 2 मालाचे गठ्ठे 3 भारे
तिये मृत्युलोकीचिये शेवटिले ।येणे जाहाले,हाटवेळे [4] ।।496।। 4 बाजार भरण्याची वेळ
आता सुखेसि जीविता [5] , । कैची ग्रहिकी कीजेल ? पंडुसुता ! । 5 सुखी जीवनाची
काय राखोंडी फुंकिता । दीपु लागे ? ।।497।।
अगा ! विषाचे कांदे वाटुनी । जो रसु घेईजे पिळूनी , ।
तया नाम अमृत ठेवुनी । जेसे अमर होणे ! ।।498।।
तेवी , विषयांचे जे सुख । ते केवळ परम दुःख ।
परि काय कीजे ! मुर्ख ।न सेवितां , न सरे [6] ।।499।। 6 थांबत नाहीत
कां शीस [7] खांडूनि आपुले , । पायीच्या खती [8] बांधिले । 7 मस्तक 8 जखम
तैसे मृत्युलोकीचे भले । आहे आघवे ।।500।।
म्हणौनि , मृत्युलोकी सुखाची कहाणी । ऐकिजेल कवणाचिये श्रवणी ? ।
कैची सुखनिद्रा अंथरुणी ? । इंगळांच्या [9] ? ।।501।। 9 निखारा
जिये लोकीचा चंद्र क्षयरोगी ! । जेथ उदयो होय , अस्तालागी ! ।
दुःख लेऊनि सुखाची आंगी [10] । सळित [11] जगाते ।। 502।। 10 दुःख सुखाचे सोंग घेऊन
जेथ मंगळाचिया अंकुरी, । सवेचि अमंगळाची पडे पोहरी [12] । 11 छळणे 12 कीड
मृत्यु , उदराचिया परिवरी । गर्भु [13] , गिवसी [14]! ।।503।। 13 पोटातील गर्भाला 14 गाठतो
जे नाही , तयाते चिंतवी । तंव , तेचि नेइजे गंधर्वी [15] । 15 अदृष्य पुरूष
गेलियाची कवणे गावी , । शुद्धी न लगे ।।504।।
अगा ! गिवसिता आघविया वाटी,। परतले पाऊलचि नाही, किरीटी ! ।
सैंध , निमालियांचिया [16] गोठी । तिये पुराणे जेथिची ।।505।। 16 मेलेल्यांच्या
जेथिचिये अनित्यतेची थोरी । करितया [17],ब्रह्मयाचे आयुष्यवेरी [18] । 17 अनिश्चतेचे वर्णन
कैसे नाही होणे , अवधारी ! । निपटुनिया [19] ।। 506।। 18 ब्रह्मदेवाच्या आयुष्या पर्यंत
ऐसी लोकीची जिये नांदणूक , । तेथ जन्मले आथि जे लोक , । 19 पूर्णपणे
तयांचिये निश्चिंतीचे [20] कौतुक । दिसत असें ।।507।। 20 बेफिकरी
पै , दृष्टादृष्टाचिये [21] जोडी-।लागी , भांडवल न सुटे कवडी , । 21 इहपर लोक
जेथ सर्वस्वे हानि , तेथ कोडी । वेचिती गा ! ।।508।।
जो बहुवे विषयविलासे गुंफे,। तो म्हणती उवाई [22] पडिला सापे [23] । 22 सुखात 23 सांप्रत
जो अभिलाषभारे [24] दडपे [25] । तयाते सज्ञान म्हणती ।।509।। 24 वासनांचे भाराने
**जयाचे आयुष्य धाकुटे होय , । बळ प्रज्ञा जिरौनि जाय , ।** 25 दडपला जातो
**तयाचे नमस्कारिती पाय ।वडील म्हणूनि ।।510।।**

जंव, जंव , बाळ बळिया [1] वाढे,। तंव,तंव,भोजे नाचती कोडे । 1 बळकटपणा
आयुष्य निमाले आंतुलियेकडे , । ते ग्लानीचि नाही ।।511।।
जन्मलिया दिवस दिवसे , । हो लागे काळाचेचि ऐसें ।
की ,वाढती करिती उल्हासे ,। उभविती गुढिया ।।512।। 2 वाढदिवस करितात
अगा ! मर हा बोलु न साहती । आणि मेलिया, तरी रडती ।
परि असते जात , न गणिती । गहिसपणे [3] ।।513।। 3 मूर्खपणे
दर्दुर सापे गिळिजतु आहे उभा,। कीं,तो मासिया वेटाळी जिभा ।
तैसे , प्राणिये कवणा लोभा । वाढविती तृष्णा ? ।।514।।
अहा ! कटकटा [4] हे वोखटे [5] , । इये मृत्युलोकीचे उफराटे । 4 हायहाय 5 दुःख
एथ अर्जुना ! जरी अवचटे । जन्मलासी तूं , ।।515।।
तरि झडझडोनि [6] वहिला [7] निघ । इये भक्तीचिये वाटे लाग । 6 झिडकारून 7 लवकर
जिया पावसी , अव्यंग । निजधाम माझे ।।516।।

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ।।34।।**
**माझ्या ठिकाणी मन ठेव,माझा भक्त हो,माझे यजन-पूजन कर, आणि मला नमस्कार कर.याप्रमाणे मत्परायण होऊन आपला योग चालविलास म्हणजे मलाच येऊन पोचशील**

तूं मन हे मीचि करी । माझिया भजनी प्रेम धरी ।
सर्वत्र नमस्कारी । मज एकाते ।।517।।
माझेनि अनुसंधाने , देख ! । संकल्पु जाळणे निःशेख ।
मद्याजी चोख । याचि नांव ।।518।।
ऐसा मिया आथिला होसी । तेथ माझियाचि स्वरुपा पावसी ।
हे अंतःकरणीचे तुजपासी । बोलिजत असे ।।519।।
अगा ! अवघिया चोरिया आपुले । जे सर्वस्व , आम्ही असे ठेविले ।
ते पावोनि ,सुख संचले । होऊनि ठासी ।।520।।
ऐसे सांवळेनि परब्रह्मे । भक्तकामकल्पद्रुमे ।
बोलिले आत्मारामे । संजयो म्हणे ।।521।।
' अहो ऐकिजत असे की अवधारा ' । तंव , इया बोला निवांत म्हातारा ।
जैसा म्हैसा नुठी [8] का पुरा [9] । तैसा उगाचि असे ।।522।। 8 न उठणे 9 पूराला न जुमानता
तेथ संजये माथा तुकिला ।अहा ! अमृताचा पाऊस वर्षला ।
की हा एथ असतुचि , गेला । सेजिया [10] गावा ।। 523।। 10 जवळच्या
तऱ्ही दातारु हा आमुचा । म्हणौनि हे बोलता , मैळेल वाचा ।
काय कीजे ! ययाचा । स्वभावोचि ऐसा ।।524।।

परि बाप ! भाग्य माझे । जे वृत्तांतु सांगावयाचेनि व्याजे ।
कैसा रक्षिलो मुनिराजे । श्रीव्यासदेवे ! ।।525।
येतुले हे वाड ,सायासे । जंव बोलत असे दृढमानसे ।
तंव , न धरवेचि आपुलिया , ऐसे ।सात्विके केले ।।+526।।
चित्त चाकाटले [1] , आटु [2] घेत । वाचा पांगुळली जेथिची तेथ ।     1 चकित होणे 2 हट्ट
आपाद कंचुकित [3] ।रोमांच आले ।।527।।     3 आच्छादिले
अर्धोन्मीलित डोळे । वर्षताति आनंदजळे ।
आंतुलिया सुखोर्मीचेनि बळे । बाहेरी कांपे ।।528।।
पै , आघवाचि रोममुळी । आली स्वेदकणिका निर्मळी ।
लेइला मोतियांची कडियाळी [4] । आवडे तैसा ।।529 ।।     4 जाळीदार अंगरखा
ऐसा महासुखाचेनि अतिरसे । जेथ आटणी हो पाहे जीवदशे ।
तेथ निरोपिले[5] व्यासे । ते नेदीच हो [6]! ।।530।।     5 आज्ञा केलेले 6 करावयाचे राहून गेले
आणिक , श्रीकृष्णाचे बोलणे । घोकरी [7] आले श्रवणे ।     7 घोंघावत
की देहस्मृतीचा तेणे । वापसा [8] केला ।।531।।     8 वाफसा
तेव्हा नेत्रीचे जळ विसर्जी । सर्वांगीचा स्वेदु परिमार्जी ।
तेवीचि 'अवधारा म्हणे हो जी ! । धृतराष्ट्राते ।।532।।
आता श्रीकृष्णवाक्यबीजा निवाडु । आणि संजय सात्त्विकाचा बिवडु [9] ।     9 सुपीक जमीन
म्हणौनि , श्रोतया होईल सुरवाडु । प्रमेय पिकाचा ।।533।।
अहो ! अळमाळु अवधान देयावे । येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावे ।
बाप ! श्रवणेंद्रिया दैवे । घातली माळ ।।534।।
म्हणौनि , विभूतीचा ठावो । अर्जुना दावील सिद्धांचा रावो ।
' तो ऐका ' म्हणे ज्ञानदेवो ।निवृत्तीचा ।।535।।

**इति श्रीमद्भगवदगीतासुउपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्य-योगो नाम नवमो ऽध्यायः।।9।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

1. श्रीज्ञानदेव म्हणतात,श्रोतेहो आपण मजकडे पूर्ण लक्ष द्या म्हणजे तुम्ही सर्व सुखास योग्य अधिकारी व्हाल. माझी ही उघड उघड प्रतिज्ञा आहे.

2 परंतु महाराज,तुम्हा सर्वज्ञांचे सभेमध्ये मी पांडित्याच्या आढ्यतेने असे बोलत नाही हो! तर ' एक लक्ष द्या ' ही माझी आपणास लडिवाळपणाची विनंती आहे.

3. आपणासारखे ज्ञानसंपन्न माहेर,समर्थ मातापितरे असतील तर लडिवाळाचेही लाड पूर्ण होतील आणि मनोरथांचीही इच्छा तृप्त होते

4. महाराज! तुमच्या कृपादृष्टीच्या ओलाव्याने टवटवीत झालेले प्रसन्नतेचे मळे सर्वतोपरी विकसित झाले आहेत. या मळ्यांची थंडगार सुशीतल सावली पाहून संसाराने श्रमलेला असा जो मी तो त्या ठिकाणी विश्रांतीसाठी लोळत आहे

5 महाराज ! आपण समर्थ गोसावी असून सुखरुपी अमृताचे डोहच आहात म्हणून आम्ही आपल्या इच्छेप्रमाणे त्यात बागडून ओलावा प्राप्त करुन घेत आहोत. या ठिकाणी जर लडिवाळपणाने आपल्याशी सलगी करण्यास भिऊ लागलो तर शांत तरी कोठे व्हावे?.

6 बालक बोबड्या बोलाने व वाकड्या पावलाने चालते पण त्याची आई त्याचे कौतुक करून अंतरी अतीव संतोष पावते.

7 त्याप्रमाणे महाराज आपल्यासारख्या संताची प्रीती कोण्या तरी निमित्ताने मजवर व्हावी या उत्कट इच्छेने आपल्याशी हा लडिवाळपणा करीत आहे

8 नाही तर आपणासारख्या सर्वज्ञ श्रोत्यास माझ्या बोलण्यापासून नवीन असे काही समजणार आहे , असें मुळीच नाही. अहो! सरस्वतीपुत्राला क्रमाने धडे पाठ करवून त्यास विद्या शिकवावी लागते काय?

9 आता हे पाहा की, हवा तेवढा मोठा काजवा असला तरी सूर्याच्या महातेजात तो मुळीच शोभत नाही.त्याप्रमाणे मी व माझे व्याख्यान आपल्या सर्वज्ञांच्या सभेत शोभून दिसणार नाही;मी याला काय करु!! अमृताच्या ताटात वाढण्याजोगी पक्वान्नांची पाकनिष्पत्ती कोठून करावी?

10 अहो! शीतल किरण असलेल्या चंद्राला पंख्याने वारा घालणे किंवा साक्षात नादब्रह्मापुढे गायन करुन त्यास ते ऐकविणे किंवा अलंकाराला अलंकार घालणे असे कधी कोठे असते काय?

11 सांगा, सुगंधाने कशाचा वास घ्यावा?समुद्राने कोणत्या स्थानी स्नान करावे?हे सर्व आकाशच मावेल अशी मोठी वस्तू कोणती आहे बरे?

12 त्याप्रमाणे तुमचे अवधान, श्रवणेच्छा तृप्त होईल आणि तुम्ही म्हणाल ' वा ! हे अती समाधानकारक व्याख्यान होय! असे उत्कृष्ट वक्तृत्व जगात कोणाजवळ आहे?

13 तथापि विश्वाला प्रकाशित करणाऱ्या सूर्याला काडवातीने आरती करु नये की काय? किंवा सर्व जलांचा स्वामी असणाऱ्या समुद्रास चुळकाभर पाण्याने अर्घ्य देऊ नये की काय?

14. सामर्थ्यसंपन्न स्वामी ! आपण शंकराचीच केवळ मूर्ती आहात, मी मात्र गरीब मनुष्य तुमची भक्तिभावाने पूजा करीत आहे. म्हणून माझें बोल जरी निरगुडीसारखे ठसेठोंबसे असले तरी आपण त्याचा स्वीकार करालच

15 अहो ! लहान मूल आपल्या बापाच्या ताटात जेवावयास बसते व ताटात हात घालून प्रेमाने बापालाच भरवू लागते तेव्हा तो बापही संतोषाने आपले तोंड तो घास घेण्याकरिता समोर करतो

16 त्याप्रमाणे मी तुमच्याशी जरी विनोदाने , पोरबुद्धीने बडबड करीत आहे, तरीही तुम्ही त्या माझ्या बडबडीने संतोषितच व्हाल असा प्रेमाचा जातिस्वभावच आहे.

17 आणि त्या आपलेपणाच्या प्रेमाच्या अतीव मोहाने युक्त आपण आहात. म्हणून आपण संतसज्जनांनी हा ज्ञानदेव आपला आहे, म्हणून अंगीकार केला आहे. म्हणूनच मी केलेल्या सलगीचे आपणास ओझे वाटणार नाही.

18 अहो ! गायीच्या तान्ह्या वासराने सडाला ढुसण्या दिल्या तर त्या योगाने गायीला अधिकच पान्हा फुटतो, त्याप्रमाणे जो अत्यंत प्रिय मनुष्य असतो त्या प्रेमळाच्या रागावण्याने त्याच्याविषयी प्रेम दुणावत असते

19 म्हणून महाराज ! मज लेकराच्या बोबड्या बोलण्याने तुमचे निजलेले कृपाळुपण जागे होईल असें मला वाटले. म्हणूनच मी ' अवधान एकले दीजें ' असें आरंभी प्रतिज्ञावाक्य बोललो.

20 वास्तविक पाहता, गीतार्थाचे काम अवघड आहे. चांदणे कोणी आढीत घालून दडपण ठेवून पिकवितो कीं काय ? किंवा वाऱ्याला वाहण्याकरता कोणी गतिप्रवाहात घालीत असतो कीं काय ? तसेच आकाशाला गवसणी कशी घालावी ?

21 असें पहा कीं, स्वभावतःच पातळ असलेल्या पाण्यास पुन्हा पातळ करावे लागत नाही. लोण्यामध्ये रवीने कोणी घुसळीत नाही. त्याप्रमाणे गीतार्थाला पाहून लाजलेले माझें व्याख्यान माघारी परत फिरत आहे.

22 हे असो, ज्याच्यापुढे वेदरुपी सूर्य मावळल्यावर ' न इति न इति ' असें म्हणून वेदांचेही शब्द कुंठित होतात ते वेदही ज्या परमात्म्याच्या बाजेवर निवांत निजतात असा गीतार्थ मी मराठी भाषेत वर्णन करावा, अशी माझी योग्यता आहे काय ?

23 परंतु अशाही योग्यताहीन मजला , गीतार्थ सांगण्याचे सामर्थ्य नसून ते धैर्य करीत आहे ते याच एका आशेवर कीं कसेतरी धिटाईने बोलून आपल्यासारख्यांच्या कृपाप्रेमास अधिकारी व्हावे.

24 तर आतां चंद्रापेक्षाही अती सुशीतल करणारे आणि अमृतापेक्षाही अधिक जीवन देऊन जगविणारे असें जें आपले अवधान आहे त्या आपल्या अवधानाने माझ्या मनोराथास वाढते करून पुष्टी द्यावी.

25 कारण , जेव्हा तुमच्या कृपादृष्टीचा वर्षाव मजवर होईल तेव्हा माझ्या बुद्धिरूप भूमीत सकलार्थ ज्ञानरूप धान्य पिकेल व मजला संपूर्णतया त्याचे स्फुरणदान होईल. एरवी जर तुम्ही अवधान देण्याबाबत उदासीन राहाल तर अंकुरदशेत आलेले माझें ज्ञानही सुकुन जाईल.

26 आतां असे पहा कीं, सहजच वक्तृत्वास आपल्यासारख्या श्रोत्यांचा अवधानरुप चारा मिळाल्यावर त्याच्या प्रत्येक अक्षररूपी अवयवाला सिद्धांतरुपी पुष्टी पेलण्याचे सामर्थ्य येईल.

27 अर्थ हा शब्द ,आपल्या अभिव्यक्तिसाठी, वक्त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडण्याचीच वाट पाहील. शब्द बाहेर पडल्यावर एक अभिप्राय दुसऱ्या अभिप्रायास प्रसवेल आणि बुद्धीवर भाव, विभाव, अनुभव इत्यादि भावांचा असा कांहीं फुलोरा येईल कीं, त्यामुळे नवविध रस अर्थ व भावपूर्ण रीतीने अभिव्यक्त होऊन ओसंडु लागतील. त्यासाठी आपले अवधान असणे जरुरीचे आहे.

28 म्हणून श्रोत्यांच्या व वक्त्याच्या प्रश्नप्रतिवचनात्मक तत्त्वबोधद्वारा हितकर असा संवादरूपी व साहित्यरूपी मेघ वळून येतात पण श्रोता जर संत्रस्त चित्ताचा असेल तर वक्तृत्वात श्रोत्यांसमोर मांडलेला रसही वितळून जाईल.

29 अहो ! चंद्रकांत मण्याला पाझर फुटतो हें खरे ; पण त्यास पाझरावयास लावण्याची चातुर्य युक्ती चंद्राच्याच ठिकाणी असते. त्याचप्रमाणे वक्त्याच्या व्याख्यानात रसालंकारादी गुणांच्या आविष्कारास लागणारी शक्ती ही अवधान देणाऱ्या श्रोत्यांवर अवलंबून आहे. एकाग्र लक्ष देणाऱ्या श्रोत्याविना , वक्ता तो यथार्थ वक्ताच होऊ शकत नाही.

30 पण पहा , आतां आम्हांला गोड करून घ्या अशी तांदुळांनी जेवणारांची विनंती करावी लागते काय किंवा कळसूत्री बाहुल्यांनी आम्हाला चांगले नाचवा म्हणून सूत्रधारास विनंती करावी लागते काय ?

31 तो सूत्रधार काय बाहुल्यांच्या कामाकरिता नाचवितो , कीं स्वतःच्या कलाज्ञानाची कुशलता दाखवून चातुर्य वाढवीत असतो ? त्याप्रमाणे मी बाहुली आहे. आपण जसे बोलवाल तसे मी बोलणार किंवा 'अवधान द्या ' वगैरे म्हणण्याच्या उठाठेवीचे काय काम आहे.

32 त्यावेळी श्रीगुरु श्रीनिवृत्तिनाथ म्हणाले, अरे इतके बोलण्यासारखे झाले तरी काय ? आम्हास ' अवधान एकले दीजें ' या तुझ्या म्हणण्याचा सर्व कांहीं अभिप्राय समजला. आतां श्रीकृष्णांनी अर्जुनास सांगितले ते आम्हांस सांग

33 तेव्हा संतोष पावून श्रीनिवृत्तिनाथांचे दास ज्ञानदेव उल्हासाने म्हणाले, होय महाराज ! ऐका तर. श्रीकृष्ण असें बोलले.

71 माझ्या स्वरूपाच्या आड येणारी माया आणि तुला भ्रमात पाडणारी कल्पना, त्या माया आणि कल्पना दोन्ही टाकून देऊन तत्पदलक्ष्यभूत व त्वंपदलक्ष्यभूत अखंडैकरस निरुपाधिक असे माझें यथार्थरूप पाहू लागलास तर तुला असें दिसून येईल की, माझ्या आश्रयावर सर्व भूते आहेत. असें आताच तुला सांगितले ते सर्व मिथ्या आहे. वस्तुतः भूते वगैरे कांहीं नाही. सर्व कांहीं मीच आहे असा निश्चय होईल.

72 अशी वस्तुस्थिती असूनही संकल्परूप संध्याकाळचे वेळेस जिवाचे ज्ञानरूप डोळे अज्ञानरूप अंधकाराने कांहीं वेळ झाकले जातात, बुद्धी, दृष्टी मंद होते. म्हणून मी अखंडैकरस असता ते अस्पष्ट होते व भूते मजहून निराळी असल्यासारखी दृष्टीस पडतात.

73 ज्याप्रमाणे माळेवरील रज्जूवरील सापाची भ्रांती गेल्याबरोबर माळ मूळ स्वरूपाने शिल्लक राहते, त्याप्रमाणे त्यास संकल्परुपी संध्याकाळची वेळ नाहीशी झाल्याबरोबर माझें अखंडित एकरस स्वरूपच अवषेश राहते.

74. सहज विचार करून पाहिले तर भूतभेदाच्या प्रतीतीला पहाणाराचा अज्ञानजन्य संकल्पच कारण आहे. हें पक्के समज. घागरी, मडके, वगैरेचे जमीनीतून आपोआप आकारात्मक कोंभ निघतात काय ? तर नाही. परंतु कुंभाराच्या बुद्धीच्या कल्पनेचेच ते सर्व आकार उमटले आहेत.

75 किंवा समुद्राच्या पाण्यात लाटांच्या काय खाणी आहेत ? तर ते रूपांतरात्मक लाटांचे कृत्य वाऱ्याचे नाही काय ?

76 हें पहा ! कापसाच्या पोटात कापडाचे गठ्ठे आहेत काय ? नेसणाऱ्याच्या समजुतीने तो कापूस कापड बनला आहे.

77 जरी सोन्याचे दागिने बनविले तरी त्याचे सोनेपण नाहीसे होत नाही. बाकीं स्थूल दृष्टीने वरपांग सोन्यापेक्षा वेगळे अलंकार भासतात. ते वापरणाराच्या कल्पनेनेच.

78 आपल्या शब्दाची जी प्रतिध्वनिरूप प्रत्युत्तरे ऐकु येतात किंवा आरशात जें आपले प्रतिबिंब आपण पाहतो तो खरोखर आपल्या बोलण्याचा किंवा पाहण्याचा परिणाम आहे. किंवा आपल्या पूर्वीच ते तेथें खरेपणाने होते ? सांग बर ?

79 त्याप्रमाणे ह्या माझ्या निरुपाधिक विशुद्ध स्वरूपावर जो भूतांच्या कल्पनेचा आरोप करतो, त्याला त्याच्याच कल्पनेमुळे माझ्या ठिकाणी भूतांचा भास होतो.

80 तीचकल्पना करणारी प्रकृती संपली म्हणजें माझ्या ठिकाणचा भूतांचा भास वस्तुतः अगोदरच संपलेला असतो. मग माझें निरुपाधिक असें स्वरुप तेच निखालस एकसारखे उरते

81 हें असो, आपण आपल्या भोवती गरगर फिरले असता अंगात भोवंड आल्यामुळे ज्याप्रमाणे भोवतालची गिरिकंदरे वगैरे फिरताना अशी दिसतात. त्याप्रमाणे आपल्याच कल्पनेमुळे अखंड ब्रह्मस्वरूपात भूतांचा भास होतो.

82 तीच कल्पान सोडून पाहिले तर मी भूतांच्या ठिकाणी व भूते माझ्या ठिकाणी आहेत अशी स्वप्नातदेखील कल्पना करता येणार नाही

83 आतां , मीच एक भूतांचा धारण करणारा अथवा भूतांचा असणारा ' या सर्व गोष्टींची बोलणी संकल्परूप सन्निपात वायूतील बडबडी आहेत.

84 म्हणून हे प्रियोत्तमा ! ऐक. अशा प्रकारे मी सृष्टीचा विश्वात्मा किंवा या मिथ्या भूत समुदायास सदा आधार आहे.

85 ज्याप्रमाणे सूर्याच्या किरणाच्या आधारावर मिथ्या मृगजळ केवळ भासते एवढेच. त्याप्रमाणे माझ्या निर्गुण स्वरूपाचे ठिकाणी सर्व भूते मिथ्या आहेत असें समज. इतकेच नव्हे तर मीही एक त्यांच्यामध्ये अधिष्ठान-रूपाने व्याप्त असून त्रिकालाबाधित सत्य आहे असें समज.

86 ह्याप्रकारे करून मी भूतांचा उत्पत्तिकर्ता आहे असें म्हणतातज्याप्रमाणे सूर्य व सूर्याची प्रभा ही दोन्हीही एकच असतात, त्याप्रमाणे भूते व मी वास्तविक एकच आहोत.

183 जिच्या तोंडात द्वेषरूप दाढा ज्ञानाचा चावून चुराडा करतात व जी अगस्ती ऋषीला असलेल्या कुंभाच्या आवरणाप्रमाणे स्थूलबुद्धीच्या मूर्ख लोकांना आवरण करणारी जणू गवसणीच आहे.

213 ( यापुढे महाराज क्रमाने अष्टांगयोगाचे वर्ण करतात) बाहेरच्या बाजूस यमनियमाचे काटेरी कुंपण लावून त्या आत मूळबंधाचा, वज्रासनाचा कोट तयार केला व त्या कोटावर प्राणायामरुपी सतत चालू असणाऱ्या जणू आग ओतणाऱ्या तोफा ठेविल्या

218 नंतर समाधीचे संपूर्ण ऐश्वर्य ज्या ब्रह्मात्मैक्यानुभवात्मक सामरस्यामुळे झाले त्या आत्मानुभवाच्या राज्यसुखावरच त्या योग्याला अभिषेक झाला

239 तर ' ज्ञानयज्ञ ' तो अशा स्वरूपाचा आहे कीं, ज्या ज्ञानयज्ञात ( मी एक असलेला अनेक रुपांनी व्हावे ) असा जो आदिसंकल्प हाच पशू बांधावयाचा यज्ञस्तंभ होय. पंचमहाभूते हा यज्ञ मंडप आहे .( जीव व ईश्वर यांच्यातील भेद हाच पशू आहे )

240 मग पंचमहाभूतांचे शब्दस्पर्शादी विशेष गुण अथवा पाच इंद्रिये आणि पंचप्राण हीच यज्ञाची साहित्य सामग्री होय व ब्रह्माविषयी जें अज्ञान तेच तूप आहे.

241 हे अर्जुना ! ज्या यज्ञात मन व बुद्धी ही दोन कुंडे असून त्यात ज्ञानरूपी अग्नी प्रदीप्त केला जातो ( सुख व दुःख द्वंद्वाविषयी चित्ताची ) जी समता हीच बळकट वेदिका म्हणजें यज्ञकुंडाचा ओटा आहे असें तू समज.

242 आत्मानात्म विचार करण्याविषयी जी बुद्धीची कुशलता तीच यज्ञातील मंत्र होत. विद्येची महती स्त्रुक व शांतिस्त्रुवा ही ( स्त्रुक व स्त्रुवा ही दोन लाकडी पळ्यासारखी यज्ञपात्रे असतात) व जीव हा यज्ञ करणारा यजमान असतो.

243 तो यज्ञ करणारा जीव स्वानुभवरूप पात्रांनी ब्रह्मविचाररुपी महामंत्रांनी ज्ञानरुप अग्निहोत्र कर्माने जीव व ईश्वर यांच्या भिन्नपणाची आहुती देऊन तो भेद नाहीसा करतो

244 त्यावेळेस अज्ञानरुपी तूप सरून जाते. यज्ञ करणारा व यज्ञक्रिया ही जागचे जागीच थांबतात. नंतर आत्मब्रह्मात्मैक्यरसात- आनंदरुपी पाण्यात- जीवरुपी यजमान जेव्हा अवभृत स्नान करतो

245 तेव्हा यज्ञकर्ता, पंचमहाभूते,शब्द,स्पर्श इत्यादी विषय व इंद्रिये ही वेगळाली आहेत असें राहत नाही कारण तो ब्रह्मात्मैक्य बुद्धीमुळे ही सर्व ब्रह्मरुपच आहेत असें तो ज्ञानी जाणतो

295 त्यावेळी पुन्हा जग निर्माण करण्याकरिता वासनात्मक संकल्पाचे सूक्ष्म संस्कार ज्या ठिकाणी अमर होऊन राहतात ते ठिकाणही मीच आहे.

526 अशा रीतीने मोठ्या प्रयासाने मन घट्ट करून संजय मनातल्या मनात बोलत आहे , तोच त्याला न आवरेनासा सात्विक भावाचा अपरंपार गहिवर आला.